शनिवार । १६ फेब्रुवारी १९८० । ७५ पैसे

# माणूस

## नारायणपूर

उत्तर प्रदेशातील नारायणपूरचे दुःख आता वेगळेच आहे.

गावातील प्रत्येक महिला पोलिसी अत्याचारांना बळी पडलेली आहे असा गवगवा तर सर्वत्र होऊन चुकलेला आहे. राजकारण्यांनी, वृत्तपत्रांनी या घटनेचे जे काही भांडवल करायचे ते करून झालेले आहे. गावकऱ्यांची चिंता अशी की, अशा गावातील मुलींची लग्ने होणार कशी? कोण अशा बलात्कारित गावातील मुली पत्करणार? 'हम इस गावमें नही रह सकते. यहा रहे तो मेरी सोलाह सालकी लडकीसे शादी कौन करेगा?' असे नारायणपूरचा एक म्हातारा मुसलमान शेतकरी इंडियन एक्सप्रेसच्या वार्ताहराजवळ म्हणाला. आपल्या मुलीचे ठरलेले लग्न ही अत्याचाराची बातमी सर्वत्र फैलावल्यामुळे मोडते की काय, अशा चिंतेत असलेला एक कुंभारही या वार्ताहराला भेटला. एका हरिजन महिलेच्या दोन मुली. या दोघींच्या लग्नाची आता तिला काळजी. वार्ताहराशी बोलताना तिला हुंदके आवरत नव्हते.

यातील काही मंडळी तर १४ जानेवारीच्या त्या भयानक दिवशी–रात्री गाव सोडून दुसरीकडे गेलेली होती. मुलीचे लग्न ठरलेला कुंभार घरातल्या सगळ्यांना घेऊन शेजारच्या लक्ष्मीपूरला परागंदा झालेला होता. पाच दिवसांनी तो परतला. बरेचजण पोलिसी अत्याचाराच्या धाकाने अगोदरच असे कुठेकुठे गाव सोडून पळालेले होते. अशांची घरेदारे मात्र लुटली गेली. कुंभाराच्या घरात मुलीच्या लग्नासाठी जमवलेले काही सामानसुमान व ५०० रुपयांची रोकड होती. तो परतला तेव्हा हे सर्व फस्त झालेले त्याला पाहावे लागले.

एका ट्रकखाली सापडून एक वृद्ध स्त्री मरण पावली. ट्रकमालकाने या म्हातारीच्या दोन लहान नातवंडांना नुकसानभरपाई द्यावी असा नारायणपूरच्या गावकऱ्यांचा आग्रह. यातून शेजारच्या कप्तानगंज पोलिसठाण्याचा अधिकारी व गावकरी यांच्यात तंटा झाला. ११ गावकऱ्यांना धरून, ठाण्यावर नेऊन, काहींना मारहाण व काहींना इतर त्रास देण्यात आला. नंतर गावावर सूड उगवण्यात आला.

भारताच्या पंतप्रधानांनी भेट द्यावी इतकी ही घटना महत्त्वाची होती की नाही, हे आता चौकशीचा अहवाल बाहेर आल्यावरच कळेल. पंतप्रधानांनी भेट दिली, की त्यांच्या चिरंजिवांनी त्यांना भेट द्यायला लावली हे मात्र कधीच कळणार नाही. नभोवाणीमंत्री श्री. वसंत साठे विनोबांना नुकतेच भेटायला गेले, तेव्हा विनोबांनी म्हणे चिरंजिवांविषयी काळजीयुक्त स्वरात चौकशी केली. 'Sathe allays Vinoba's fears about Sanjay' या मथळ्याखाली ही बातमी 'टाइम्स'मध्ये आलेली आहे. (१० फेब्रुवारी) विनोबांनी प्रत्यक्ष राजकारण कधी केले नाही; पण त्यांना राजकारण समजत नाही असे त्यांची टिंगलटवाळी करणाऱ्यांनीही अद्याप म्हटलेले नाही. त्यांनी साठ्यांजवळ चौकशी करावी, मोरारजी देसाई, जगजीवनराम यांच्या चिरंजीवांचे संदर्भ जोडावेत, ही दुर्लक्ष करण्यासारखी बातमी निश्चितच नाही.

बेलछीला इंदिरा गांधींना प्रकाश दिसला....

नारायणपूरचा काळोख संजय गांधींना किती प्रकाशदायी ठरतो ते पाहायचे.

पण इकडच्या स्त्री-मुक्तिवादी संघटना अद्याप गप्प कशा?

स्त्रीदेहाचे अश्लील प्रदर्शन करून गल्ला भरणाऱ्या 'सत्यं-शिवं-सुंदरम्'सारख्या बाजारू चित्रपटाविरुद्ध मोर्चे काढणाऱ्या स्त्रीमुक्तिवादी तरुण-प्रौढ महिलांनी, राजकारणासाठी स्त्रीच्या अब्रूचा असा वापर करणाऱ्यांविरुद्ध निषेधाचा एक सूरही काढू नये, हे कितपत सुसंगत आहे?

त्यांनी तयारीला लागावे. चित्रपटवाल्यांपेक्षा राजकारणातील स्त्रीच्या अब्रूचा वापर हा परिणामी जास्त धोकादायक असतो.

रामायण काय......

महाभारत काय......

☐

# सप्रेम नमस्कार

## टी. व्ही. ने टिपलेली बार्शी

◻ गुरुवार दि. ७ फेब्रुवारी. रात्री १०चे इंग्रजी वार्तापत्र संपते आणि लागलीच बार्शी साहित्यसंमेलनाचा वार्तापट निवेदनासह उलगडू लागतो. पुणे आणि चंद्रपूर येथे उधळल्या गेलेल्या दोन संमेलनांचा अस्थानी संदर्भ देऊन निवेदक बार्शीचं स्थानमहात्म्य सांगतो आणि मग तिथल्या निरुंद, धुळकट रस्त्यातून टी. व्ही. च्या प्रेक्षकश्रोत्याची एकदम साहित्यदिंडीशी गाठ घालून देतो. बार्शीच्या भगवंताचं, भव्य मंदिराचं किंवा तेथील गजबजलेल्या हमरस्त्याचं क्षणभरसुद्धा दर्शन नाही. दिंड्यांतून साहित्यिक औषधाला नव्हता. तरीसुद्धा दिंडीमागून दिंडी बघण्यात दहा मिनिटं गेली. सानेगुरुजी, डॉ. आंबेडकर या अस्पृश्योद्धारकांची मोठी चित्रे दिंडीतून मिरवत पाहताना एकीकडे अभिमान वाटत होता, तर दुसरीकडे महर्षि शिंदे, सावरकर यांच्यासारख्या समाजसुधारकांचा बार्शीकरांना विसर पडावा याचे वाईट वाटत होते. समतादिंडीत असा पंक्तीप्रपंच मुळात होता की टी. व्ही. ने तो टिपला नाही कोण जाणे !

मग दिसते– संमेलनमंडपाचे पहिले प्रवेशद्वार ( कवी कुंजविहारी याच्या नावाचे ), शाहीर अमरशेख याचा अर्धपुतळा, रामजोशी प्रवेशद्वार आणि मंडपाचे दर्शनी मुख्य प्रवेशद्वार. मंडप भव्य, आकर्षक, खांबाखांबावर काव्यचित्र नि काव्यपंक्तीनी नटलेला होता. तिन्ही प्रवेशद्वारे आणि व्यासपीठाची पार्श्वभूमी स्थानिक कलावंतांच्या हस्तलाघवामुळे नेत्र सुखावीत होती. दहाबारा हजार श्रोत्यांनी हेलावत असणारा सभामंडप पाहणे हे त्याहून मोठे नेत्रसुख होते; पण टी. व्ही. ला ही रसडोळस दृष्टी टिपता येऊ नये व आपली दृष्टी फक्त काही व्यक्तींवरच केंद्रित करावी लागावी हे पाहणाऱ्यांचे दुर्दैव म्हटले पाहिजे.

संमेलनाध्यक्ष प्रा. सरदार याचे भाषण, महत्त्वाच्या भागासह प्रमुख वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले होते; पण टी. व्ही. ने दहाबारा मिनिटे ते पुन्हा ऐकवून श्रोत्याचा अंत पाहिला. वास्तविक प्रा. सरदारांचे समारोपाचे उत्स्फूर्त उत्कृष्ट भाषण टी. व्ही. ऐकवता तर बहार झाली असती; पण टी. व्ही. स्टाफ तिसरे दिवशी म्हणजे खुल्या अधिवेशनाचे दिवशी दुपारीच गाशा गुंडाळून मार्गस्थ झाला. सरदारांच्या ' फलश्रुती 'ला अशारीतीने फाटा देणाऱ्या टी. व्ही. ने इतर कार्यक्रमांची नि अनेक नामवंत वक्त्यांची फरफट करावी हे मग क्षम्यच म्हटले पाहिजे !

दलित साहित्य शाखासंमेलनाचे अध्यक्ष डॉ. भालचंद्र फडके यांचे भाग्य टी. व्ही. ने इतका वेळ उजळून उभे केले की, जणू अ. भा. दलित सा. संमेलनाच्या चौपन्नाव्या ( नव्हे संपन्नाव्या ) अधिवेशनालाच हजारो प्रतिनिधी जमले आहेत आणि बिच्चाऱ्या बागूलप्रभृतींना मध्यमवर्गीयांची मरगळ प्राप्त झाली आहे ! बार्शी संमेलनात अनेक चांगले परिसंवाद, चर्चा व कार्यक्रम झाले; पण औचित्य आणि प्रमाण या दोन बाबीकडे टी. व्ही. ने डोळे झाक केल्यामुळे संमेलनास येऊ न शकलेल्या हजारो रसिकांना विविधांगी आनंदाला मुकावे लागले.

ग्रामीण साहित्यचर्चा, भाषापरिसंवाद, काव्यचर्चा, खुले अधिवेशन, अभिषेकीचे नाट्यसंगीत, खंडोबाचे लगीन–किती तरी बोलकी दृश्ये टी. व्ही. वर दृश्यमान व्हायला हवी होती. भूतपूर्व अध्यक्ष आणि महामंडळाचे अध्यक्ष कवी अनिल महत्त्वाच्या प्रसंगी व्यासपीठावर मध्यवर्ती असत; पण टी. व्ही. ने अनिलाना वाऱ्यावर सोडून दिले. मग *अहोरात्र राबणाऱ्या कार्याध्यक्ष पन्नालाल* सुराणा प्रभृती स्थानिक कार्यधुरीणांची उपेक्षा व्हावी यात काय नवल ? मर्यादित वेळेत औचित्य व प्रमाण राखले तर हा संमेलनवार्तापट कितीतरी वास्तव व उठावदार दृश्यमान करता आला असता. निदान वार्तापट कोणासाठी– बार्शीस उपस्थित होते त्याच्यापैकी काहीसाठी की दूरवरच्या अनुपस्थित प्रेक्षकांसाठी–याचे तरी भान टी. व्ही. ने बाळगायला नको होते काय ? उधळले जाणारे संमेलन संकटास सामोरे जाणाऱ्या सरदाराच्या विवेकशील वृत्तीमुळे सुरळीत पार पडले ही संमेलनफलश्रुती टी.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : अडतिसावा
१६ फेब्रुवारी १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी ।
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

व्ही. ने टिपणे ही अत्यावश्यक बाब होती.

**भगवंत बार्शीकर**

◘ मागील ९ फेब्रुवारी अंकात 'पुणे वार्ता' यामधील 'पत्रकारितेची दोनशे वर्षे' या टिपणामध्ये भारतातील आद्य पत्रकार जेम्स 'लिकी' असे प्रसिद्ध झाले आहे. वास्तविक हे नाव जेम्स 'हिकी' असे हवे. बहुतेक हा मुद्राराक्षसाचा प्रभाव असावा.

९ फेब्रुवारी ८० **एक विद्यार्थी**
वृत्तपत्र विभाग
पुणे विद्यापीठ

◘ आपले जानेवारीचे अंकात आलेले डॉ. शरद अभ्यंकर यांचे परखड विचार वाचले. मला वाटतं, अंगवळणी पडून मुरलेले (जुने) विचार, समाज एकदम सोडून देणे शक्य नाही. अगदी मुंजीवर विश्वास नसलेले लोकसुद्धा, मुलाच्या दोन्हीकडच्या आई–आजोबाकरता का होईना, रजा वगैरे घेऊन व्यवस्थित मुंज करताना दिसतात. सुधारणेचा किंवा वाईट प्रथा नष्ट करण्याचा घास एकदम घेतला, तर पचणार नाही. हळूहळू ते लोकाच्या पचनी पाडले पाहिजे.

सिनेमा, कथा, कादंबऱ्या, व्याख्यानेद्वारा प्रचार केल्यास काही अनिष्ट चाली बंद होतील. सतीची चाल बंद करण्यासाठी शेवटी कायद्याचा बडगाच उगारावा लागला.

आपल्याकडे अजून अशिक्षित समाज खूप आहे. तो शिक्षित करणे व त्यासाठी परिश्रम करणे, ही पहिली गोष्ट. जिथे सुशिक्षित लोक वडिलांचा मान म्हणून विश्वास नसून मुंजी लावतात, जिथे विश्वास परमेश्वरावर नसतानासुद्धा डॉक्टरलोक सांगतात की, 'हे पहा, मला जेवढे प्रयत्न करणे शक्य ते मी केले. आता वाचला तर तो परमेश्वरच वाचवू शकेल,' असे का? तर पेशंटचा त्या परमेश्वरावर विश्वास असतो व डॉक्टरनाही त्या परमेश्वराच्या नावाआड दडता येते.

मी (वाईच्या) मिशन हॉस्पिटलमध्ये खूप आजारी होते. या हॉस्पिटलमध्ये दर रविवारी येशूची प्रार्थना चाले. डॉक्टरानी सांगितले (डॉ. वील्स) माझे उपाय थकले. आता मला वाचवणे येशूचे हातात! झाले. त्या रविवारी मीपण सर्वांबरोबर त्या येशूची प्रार्थना केली की, मुले सर्व लहान. मला बरी कर.' अन् दुसरे दिवसापासून मला उतार पडला कुठे तरी श्रद्धा ठेवली पाहिजे.

बगाड, कोंबडी ओवाळून टाकणे, बकरा बळी देणे वगैरे गोष्टी साक्षरतेने कमी होतील. ज्या देशात शिक्षित लोक, लोकसंख्येच्या मानाने अगदी कमी त्या देशात अशा गोष्टींची शक्यता खूप. मुजा, भूत, अगर असरा लागल्या म्हणून अघोरी उपाय करून बरेच लोक मृत्युमुखी पडतात किंवा 'देवी आल्यास' मोठ्या बाया, डॉक्टरी उपाय न करता त्या पेशंटला खोलीतल्या खोलीत मरू देतात. ही लक्षणे अडाणीपणाची नव्हेत का? श्री. अभ्यंकर लिहितात की, 'आज अभिमान वाटावा असे हिंदू धर्मात फारसे काही नाही.' मला वाटतं, त्याचे वाचन खूप असले, तरी धार्मिक वाचन फार कमी. मला तर वाटतं, इतर देशांनी अभ्यासावं इतकं हिंदुधर्मात बरंच आहे. अर्थात सर्व देशातच थोडेफार असे *अडाणी लोक* असणारच.

प्रत्येकाने संख्येने एक खेडे दत्तक घेऊन साक्षर करावे, असे कित्येकांनी सांगितले; पण असे भरीव व अवघड कार्य करणे कोणास नको. त्यातून इतका वेळ तरी कुणाला? शेवटी कुठलीही सुधारणा हळूहळू मुंगीच्या पावलांनी होईल; पण त्याचं मूळ शोधून त्यावर उपाय करणे हा खरा उपाय. नाहीपेक्षा हे लेख वाचून त्यांना सांगणार तरी कोण?

असेच मधून मधून लिहीत गेल्यास थोडी सुधारणा होईल. डॉ. अभ्यंकरांचा प्रयत्न वाईट नाही.

**सौ. कमलिनी अभ्यंकर**
५ फेब्रुवारी वाई

---

## न बुद्धिभेदं जनयेत्

---

◘ १९ जानेवारी १९८० चा 'माणूस'मधील 'सावधान, दक्ष' हा डॉ. शरद अभ्यंकर, वाई याचा लेख वाचला. लेख आवडला. जनतेने अंधःश्रद्धाळू न राहता आपल्या बुद्धीचा वापर करून जे पटेल त्याचेच अनुकरण करावे हे खरोखरच आवश्यक आहे; परंतु त्यांच्या लेखासंबंधी काही विचार मनात आले ते प्रगट करत आहे.

आपल्या देशातील बहुसंख्य लोक अज्ञान आणि अंधश्रद्धा यानी ग्रासलेले आहेत. पुष्कळ वेळा काय होते डोळसपणाने विचार करणारे सुद्धा अज्ञानातच गुरफटलेले आढळतात, त्यामुळे 'इदं य नास्ति परं च न लभ्यते' अशी स्थिती होते. खरोखरच कोणता मार्ग स्वीकारावा अशी आशंका उत्पन्न होते. उदा. पान ११ वरील दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे वाक्य आहे, 'ज्योतिष, बुवा, पारंपारिक किंवा होमोओपाथिक उपचार याना आव्हान देण्यात आले होते, त्यामुळे पुराणमतवादी राजकारणी मंडळी प्रक्षुब्ध झाली!'

१ : *ज्योतिषाचे बाबतीत परवाच्या निवडणुकीत अनुभव आलाच.* तरी परंतु हेही एक शास्त्र आहे. त्यातही जास्त खोलीत शिरून ते पाहिले पाहिजे. माणसांच्या पत्रिका बनवतात. त्या जन्मवेळेवरून. काही वेळेला घड्याळ मागेपुढे असण्याची शक्यता. केव्हा केव्हा मूल उपजल्याबरोबर त्याची काही देखभाल *करावी लागते. डॉक्टर अगर नर्स त्यात* गुंतले की वेळ मागेपुढे होण्याची शक्यता असते, अर्थात हा विषय विवाद्य.

२ : दुसरा मुद्दा बुवांचा. हल्ली खरोखरच बुवाबाजी जोरात चालते. परंतु त्यातही काही संतमंडळी असतात. अगदी सगळेच बुवाबाजी करतात असे नव्हे तर काही बुद्धिवान मंडळीही *अध्यात्ममार्गात लोकांना मार्गदर्शन* करतात. लोकांना निरनिराळे मंत्र देतात; ह्या मंत्रांचा उपयोग त्याच्या संकटनिवरणार्थ होईलच असे नाही; परंतु निरनिराळ्या प्रापंचिक अडचणींनी, व्यवहारातील. अडथळ्यानी मनुष्य गांगरतो. अशा वेळी त्याची मन:स्थिती फारच हळुवार होते. तो घाबरून जातो. तेव्हा त्याच्यात मानसिक धैर्य प्राप्त व्हावे या उद्देशाने संतमंडळी प्रयत्न करतात. काही मग जप करण्यास सांगतात की त्यामुळे मन त्यात व्यग्र राहून श्रद्धेमुळे मानसिक ताण कमी होऊन धैर्य वाढण्यास मदत होते. आता परवाच स्कायलॅब पडणार, पडेल अगर नाही पण नुसत्या कल्पनेने, विचाराने माणसाला घाम फुटतो, भयाने blood pressure वाढते, चक्कर येते; असे प्रकार न व्हावे म्हणूनच मानसिक धैर्याची आवश्यकता असते व ती या मंत्रजपाने येऊ शकते. मग गायत्रीमंत्र जपा अगर अन्य तुमच्या दैवताचा, *श्रद्धा असेल त्याप्रमाणे.*

३ : होमिओपाथिक उपचार हे काही वेळेला आश्चर्यकारक परिणाम दाखवतात. ह्याचे अनुभव मी स्वत:च घेतले असल्याने एक–दोन वर्णन करते. माझ्या हाताच्या बोटाची दोन पेरे stiff झाली होती. मूठ वळता येईना अगर सरळ करता येईना. अर्थात हाडाच्या डॉक्टरकडे गेलो. त्यांच्या शास्त्राप्रमाणे त्यानी छोटेसे operation करायचा सल्ला दिला; पण आता प्रत्येक बोटालाच त्रास व्हायला लागला तर काय करणार? शेवटी आमच्या ओळखीच्या होमिओपाथिक डॉक्टरकडे गेले. त्याच्या गोळ्या म्हणजे त्या साबुदाण्यासारख्या व पुड्या. परंतु पंधरा दिवसात बोटे पूर्ण बरी होऊन आता काही लक्षातच येणार नाही इतकी बरी झाली. एकाच्या हाताच्या बोटाला भोरी झाली होती. खूप औषध-उपचार केले पण बरे वाटले नाही; परंतु होमिओपाथिने ते पूर्ण बरे झाले. अशा लोकाची मने लेख वाचून प्रक्षुब्ध होणारच. तेही शास्त्र असले आहे.

४ : बळी देणे अगर मोठमोठे यज्ञ करणे हे मलाही पटत नाही. त्या पशूची कारण नसताना हत्या होते हे निर्विवाद; परंतु जे मांसाहार करणारे लोक आहेत, त्याच्या बाबतीत आपण काय म्हणू शकतो? किंबहुना करू शकतो? मासे, अंडी, कोंबड्या, अन्य पशु हे कापले जातातच ना? का असा अमानुष प्रकार घडू नये म्हणून सर्व समाज शाकाहारी होतो? मांसाहार बंद. अर्थात त्यातील detail माहिती मला नाही व नकोही. कारण मी पूर्ण शाकाहारी किंबहुना कादा–लसूण न खाणारी व्यक्ती आहे; परतु आता नविनच वाचनात आले 'वनस्पतीना भावना असतात.' मग सगळीच पंचाईत! असो!

५ : पान १३ वर बरीच प्रश्नमालिका आहे. त्यापैकी सगळ्याची कारणमीमासा न देता ग्रहणासंबंधी थोडे लिहिते–

ग्रहणकाळात दान केल्यास ग्रहण लौकर सुटेल ही कल्पना अशास्त्रीय आहे, याबद्दल प्रत्यवाय नाही; परंतु त्याबरोबर हे लक्षात ठेवले पाहिजे की, ग्रहण केव्हा लागणार, केव्हा सुटणार, किती तास आहे हे सामान्य जनालाही माहीत असते व श्रद्धाळू लोक दोन्ही वेळा स्नान करतात. जपजाप्य करतात. आता दान केल्याने ग्रहण सुटेल ही भावना असती तर घड्याळ बघून ग्रहण सुटण्याची वेळ पाहण्याचे कारण नाही. अशा वेळी दान मागणारे मागतात, देणारे देतात. एरवी नाही. यावेळी तरी मिळू द्या की गरिबाला.

६ : पान १५ वर काही कार्यक्रम सुचवला आहे. त्यापैकी काहीचा परामर्श घेते. १) श्राद्धासंबंधी जास्त न बोलावे हे योग्य. ज्याचे जाते त्याला दु:ख होते. तो या ना त्या कारणाने काही विधी करतो. आता त्यालाही बराचशी काटछाट मिळाली आहे. व आपण सुचवल्याप्रमाणे समाजकार्याला मदत दिली जाते. अर्थात् आपल्यापेक्षा मला माहिती थोडी आहे. २) प्रेत तिरडीवर न्यावे, पुढे कसा काय विधि करावा? आपल्याला माहीत असेलच परवाच वैकुंठात (पुण्याच्या) कळवले होते की, 'वीज पुरवठा नसल्याने विद्युतदाहिनी बंद' आता काय करणार? मृत्यु काय थांबणार की पुढच्या क्रिया? तेव्हा थोडी आग्रही वृत्ती नसावी व जनसंपत्तीचा नको तेथे विचार वाटतो. यापेक्षा दर दोन वर्षी निवडणुका, भ्रष्टाचार, fraud असे विषय आपण घेतले असते तर जास्त पटणारे, वरील विचार हा बराचसा भावनेचा असतो.

आत्म्यासंबंधी खरोखरच काय कल्पना हे जाणणे कठीण, परमेश्वरासंबंधीच जेथे निश्चित कल्पना नाही किंबहुना तो आहे अगर नाही याचा वाद आहे, तो आत्म्याला शाती काय देणार व कसा? आपल्याला 'जीवासंबंधी' तरी काय सांगता येते? जीव हा काय प्रकार असावा? न दिसणारा, केव्हाही नाहीसा होणारा, पुढे कोठे कसा जातो कोणला निश्चित कल्पना? स्वर्ग वगैरे फार दूरच्या गोष्टी; पण मला वाटते पुण्यात काही विद्वान मंडळी आहेत त्याच्याकडे चर्चा केल्यास बरे.

७ : आता शेवटचा व महत्त्वाचा मुद्दा म्हणजे १२ पानावरील शिवलिंग पूजनाचा. खरोखर आजपर्यंत आमच्या डोक्यात कधीच अशी कल्पना आली नाही. एक तर ज्या दृष्टिकोनातून पाहतो तेच खरे बाकी सर्व चूक किंबहुना वेडगळपणाचे असे मानले जाते. शिवलिंग हे एक Symbol आहे. राम, लक्ष्मण, विष्णु या सर्वांच्या मूर्ती करतात. महादेवाचे प्रतिक म्हणून काय असावे तर शिवलिंग काही शिवलिंगासभोवती नागाची एक दोन वेटाळी व डोक्यावर फडा असे आपण पाहतो मग याचा अर्थ काय करणार? उगीचच काही तरी बीभत्स कल्पना लोकांच्या पुढे मांडणे योग्य नव्हे. आता नवीन पूजा करणाऱ्याच्या किंवा आम्ही पूजेला नसल्यानंतरही आमच्या मनात हा एक विचित्र विचार डोकावणार. खरं म्हणजे पूर्वापार पिढ्या न पिढ्या महादेवाचे हे का प्रतिक बनवले याचा अगोदर बुद्धिवतानी, सशोधन करून निर्णय घेऊन मगच लिहावे असे वाटते गीतेतेच असे म्हटले आहे की—

'न बुद्धिभेद जनयेत्, अज्ञाना कर्मसंगिनाम्'

आपल्या धर्मात काहीच अर्थ नाही बुद्धीला पटणारे शास्त्रीय संशोधनात योग्य, तेवढेच असे म्हटले गेले. खरे पण आधुनिक मेडिकल सायन्स इतके प्रगत आहे तरी त्यातसुद्धा पायापासून मेंदूपर्यंत, सर्वांचे परिभाग करूनही काही विकाराचे कारण सापडत नाही असे अनुभवाला येते.

आपलं घर जुनं झालं, मोडकळीस येणार असे वाटल्याबरोबर पाडू नये. जर नव्याची संपूर्ण तयारी करावी. मगच नव्याचा विचार करावा. आता हाही एक दुसरा लेख तयार होईल व माझ्या बुद्धीलाही फार ताण सोसावणार नाही म्हणून येथेच पुरे करते.

९ फेब्रुवारी **डॉ. कमल कामत, पुणे**

□ डॉ. शरद अभ्यंकर याचा मूळ लेख व त्यावरील विशेषेकरून वैशंपायन यांचे पत्र वाचनात आले. (८–२–८० चा माणूस) डॉ शरद अभ्यंकर याची शास्त्रीय विचार प्रसारामागील कळकळ मी जाणून आहे. तसेच शिवाम्बूपान पद्धतही अयोग्य आहे असेही माझे मत आहे.

तरीपण–

१ : डॉ. शरद अभ्यंकर यांची उत्तर देण्याची पद्धतच अशास्त्रीय आहे.

२ : जी शास्त्रीपद्धत म्हणून ते सांगतात ती त्यांनी स्वत:ही अवलबिलेली नाही.

३ : वैद्यकीय परिषदेतील त्यांची समजूत पटवणाऱ्या डॉक्टरानीही ही पद्धत अवलंबिली आहे असा कोठेही उल्लेख नाही.

४ : कोणताही संशोधक मनात तिरस्कार ठेवून एखाद्या गोष्टीचे संशोधन करू शकत नाही.

५ : स्वतः डॉक्टरनी पाच रुग्णांवर प्रयोग केले त्यातील एक बरा झाल्याचे मान्य केल्यावरही (२०%) यशानंतरही डॉक्टरच लिहितात– 'एकट्या मोरारजींच्या उदाहरणाला शास्त्रीयदृष्ट्या कवडीचीही किंमत नाही. मग भले पंतप्रधानपद उत्तम संभाळोत की १०० वर्षे निरोगी जगोत!'

मलपृष्ठ ३ वर

# न सुटणारे ग्रहण

वा. दा. रानडे

आज खग्रास सूर्यग्रहण आहे. ८२ वर्षांनंतर अशा प्रकारचे ग्रहण पहायला मिळणार आहे. शास्त्रीयदृष्ट्या त्याचा अभ्यास व निरीक्षण शास्त्रज्ञ करणार आहेत. पण मला आज दर्शन घडत आहे ते निराळ्याच ग्रहणाचे. ते आहे सत्ता ग्रहण. आपल्या लोकशाहीला हे सत्तेचे ग्रहण लागले आहे. चंद्रग्रहणे व सूर्यग्रहणे ग्रहाच्या गतीनुसार ठराविक कालाने होतात, तसे या ग्रहणाचे नाही. या सत्ताग्रहणाला ठराविक नियम नाहीत, ठराविक काळ नाही. राजकीय क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी व्यक्तींच्या लहरीनुसार त्याची गती, त्याचा काळ, त्याचे नियम ठरत असतात, बदलत असतात.

काही ठराविक तासानी सूर्यग्रहणातून सूर्याची मुक्तता होईल, पण आपल्या लोकशाहीला लागलेल्या सत्तेच्या ग्रहणाबद्दल तसे काही सांगता येणार नाही. निसर्गनियमानुसार ग्रहणे येतात व जातात; सत्ताग्रहणाचे तसे नाही. प्रयत्नपूर्वक घालविल्याशिवाय हे ग्रहण जाणार नाही. ते घालविणे अवघड आहे याचे कारण ही काही अनिष्ट घटना आहे याची जाणीवच आपल्यापैकी अनेकाना नाही. एका दृष्टीने हे न सुटणारे ग्रहण आहे. कोणतेही सरकार म्हटले की सत्ता आलीच. सत्तेशिवाय सरकारची कल्पनाच करता येणार नाही. माणसाला जेथे सरकारची, राज्यसंस्थेची गरजच भासणार नाही अशा आदर्श समाजाची स्वप्ने आपल्या प्राचीन दार्शनिकानी पाहिली आहेत आणि अलीकडच्या काळात कार्लमार्क्स व महात्मा गांधींनी पाहिली आहेत; पण हे स्वप्न साकार होण्याची शक्यता नजीकच्या काळात तर नाहीच, पण दूरच्या काळातही दिसत नाही. राज्यसंस्थेचा विलय हे मार्क्सवादाचे अंतिम उद्दिष्ट, पण पहिली समाजवादी क्रांती झालेल्या रशियात राज्यसंस्थेचा क्रमाक्रमाने लय होण्याऐवजी तिच्या हाती सत्ता केन्द्रित होऊन ती अधिक बळकट झाली आहे. सत्तेच्या विकेन्द्रीकरणाची कल्पना महात्मा गांधी, डॉ. राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण यांनी मांडली. तिचा तोंडदेखला पुरस्कार आजही केला जातो; पण प्रत्यक्षात विकेंद्रीकरण यशस्वी होण्याऐवजी केन्द्रीकरणच अधिकाधिक होत आहे. सत्तेचे ग्रहण सुटण्यासाठी विकेन्द्रीकरणासाठी सतत लढा द्यावयाला हवा.

सत्ताग्रहणाच्या किंवा अधिकारग्रहणाच्या संदर्भात एका मूलभूत मुद्द्याचा विचार करायला हवा तो म्हणजे, समाजपरिवर्तन घडवून आणणारानी सत्तेपासून नेहमी दूरच राहायला हवे का ? ते सत्तेपासून दूर राहिल्याने उलट सत्तेचा स्वार्थासाठी वापर करणारांना रान मोकळे होणार नाही का ? सत्तेचा वापर समाजपरिर्तनासाठी करणे शक्यच नाही का? 'सत्ता माणसाला भ्रष्ट करते आणि सर्वंकष सत्ता सर्वार्थाने भ्रष्ट करते' हे वचन विख्यात आहे. ते सर्वसाधारणपणे खरे असले तरी त्यातून एक प्रकारची अगतिकता सूचित होते. ध्येयवादी व्यक्तींनाही हे आव्हान आहे. सत्तेचा वापर समाजपरिवर्तनासाठी करण्याचा आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न करू, त्यात अपयश आले तर सत्ता सोडू; पण स्वतःच्या, कुटुंबियांच्या, गटाच्या, वर्गाच्या स्वार्थासाठी तिचा वापर करणार नाही अशी प्रतिज्ञा करून त्यानी सत्ता राबवायला हवी. सत्तेपासून दूर राहणाराचा आपण गौरव करतो; पण अशा व्यक्तींचे दोन वर्ग करायला हवेत. एक सत्ता राबविण्यासाठी आवश्यक असलेले गुण आमच्यात नाहीत या आपल्या मर्यादा ओळखून आपल्या कार्यशक्तीला अनुरूप असे प्रबोधनाचे, सेवेचे किंवा संघर्षाचे क्षेत्र निवडणाराचा आणि दुसरा सत्ता राबविण्याचे गुण अंगी असूनही केवळ अपयशाच्या, दुष्कीर्तीच्या भीतीने दूर राहणाराचा. यापैकी दुसऱ्या वर्गातील व्यक्तींचा मार्ग पळपुटेपणाचा आहे. समाजपरिवर्तनाचे एक साधन म्हणून सत्तेचा वापर ज्यांना शक्य त्यानी जरूर करायला हवा. तसे न करणे म्हणजे आपली जबाबदारी टाळणे होय. अपयश येईल, चुका होतील; पण अनुभवाच्या प्रकाशात त्यातूनच पुढची वाट दिसू लागेल. पण समाजपरिवर्तनाच्या मूळ ध्येयापासून विचलित व्हावयाचे नाही हे भान या व्यक्तींनी सतत ठेवायला हवे, आपल्या कार्याचे सतत आत्मपरीक्षण करायला हवे आणि ध्येयवाद सोडून आपण स्वार्थाच्या मागे लागलो असे ज्या क्षणी वाटेल त्या क्षणी सत्ता सोडायला हवी.

सत्ता हे मानवी समाजजीवनाचे एक आवश्यक अंग आहे, या अर्थाने सत्तेचे ग्रहण कधीच सुटणार नाही. सत्तेच्या ग्रहणातून सुटावयाचे याचा अर्थ स्वार्थासाठी सत्ता राबविण्याचे राजकारण सोडावयाचे. सत्तेबरोबर येणारा स्वार्थ व इतर अनिष्ट गोष्टी यांचा त्याग करावयाचा; पण हे साध्य कसे करणार ? लोकशिक्षण, लोकमत, लोकशाही, लोकशक्ती, लोकसंघर्ष, लोकसत्ता हे शब्द आपण सर्रास वापरत असतो. त्यांचा अर्थ नीट समजून या शब्दांची नुसती पोपटपंची न करता त्यात अभिप्रेत असलेले कार्य करायला हवे. लोकसत्ता हे लोकशाहीचे परिणत रूप आहे ते गाठण्यासाठी तळापासून लोकशाहीची उभारणी करायला हवी. लोकसमिती हा लोकसत्तेचा तळचा प्राथमिक घटक. जयप्रकाशांनी लोकसमित्यांची कल्पना मांडली पण आपल्यापैकी कितीजण हा प्रयोग राबविण्याचा प्रयत्न करीत आहोत ? पक्षनिरपेक्षवृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या कार्याला वाहून घेतले पाहिजे. लोकसमित्या संघटित करीत असतानाच लोकशिक्षणाचे कार्य करायला हवे. लोकशिक्षण म्हणजे केवळ साक्षरता–मोहीम नव्हे. आपल्यापुढील मुख्य प्रश्न कोणते, ते कसे सोडवावयाचे याचे ज्ञान लोकाना देणे आणि आपल्या अनुभवातून ते पडताळून पहायला लावणे हे खरे लोकशिक्षण. लोकशिक्षणातून लोकजागृती होते व लोकजागृतीतून लोकमत घडत असते.

मतपेटीतून आपले मत निर्भयपणे व्यक्त करून आपल्याला हवे असलेले सरकार बनविण हा मोठा अधिकार जनतेने झगडून मिळविला आहे. निवडणुकीच्या मार्गाने शांततापूर्ण सत्तांतर झाले की मतपेटीने केलेली क्रांती असे त्याचे वर्णन आमचे राजकीय पंडित व पत्रपंडित करतात, पण ही क्रांती नसते. ते केवळ सत्तांतर असते. त्यातून समाजपरिवर्तन होत नाही. समाजपरिवर्तनासाठी केवळ सरकार बदलणे पुरेसे नाही. माणूस बदलायला हवा. त्यासाठी संपूर्ण क्रांतीचे उद्दिष्ट पुढे ठेवून कार्य करायला हवे. केवळ निवडणुकीपुरता एक दिवस मतदानाचा हक्क बजावून न थांबता लोकसमित्यांच्या द्वारे लोकशक्ती संघटित करायला हवी. अशा संघटित लोकशक्तीचा अंकुश लोकप्रतिनिधींवर असला तरच ते नेहमी योग्य मार्गावर राहतील. ही लोकशक्ती मतपेटीतून व्यक्त होईल तशीच अन्यायाविरुद्ध संघर्षातून आणि विधायक कार्यातूनही व्यक्त होईल. समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात विविध पातळीवर तिचा आविष्कार व्हावयाला हवा. या प्रभावी लोकशक्तीतून खऱ्या अर्थाने लोकसत्ता निर्माण होईल. लोकशाहीला लागलेले सत्तेच्या स्वार्थी वापराचे ग्रहण तेव्हाच सुटेल. अपूर्णतेतून पूर्णतेकडे जाण्यासाठी मानवसमाज देत असलेल्या झगड्याचाच हा भाग आहे. त्यात चुका होतील, कधी पीछेहाट होईल; पण त्यातूनच पुढची वाट दिसेल. ☐

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# पुराणातील वांगी

इस्राइलसारख्या लहानग्या देशाने थोड्या अवधीत स्वतःची सर्वांगीण प्रगती करावी आणि सर्व साधने उपलब्ध असलेल्या भारताने, जिथे गंगेसारखी नदी आहे, सर्व साधने उपलब्ध आहेत अशा आमच्या खंडप्राय भारताने मात्र मागे पडावे, याची खंत खूपच लोकांना वाटते. भारत मागे पडण्याचे कारण ते लोक शोधीत असतात. ते कारण शोधावयास त्यांना लांब जावयास नको. पुण्यात विद्यार्थी सहाय्यक समितीच्या फर्ग्युसन रोडवरील नव्या वसतिगृहाच्या एका खोलीत ते त्यांना मिळाले असते.

तेथे डॉ. गुजर यांचे इस्राइलची शेती या विषयावर दि. २–२–८० या दिवशी सायंकाळी व्याख्यान होते. व्याख्यानाच्या आधी डॉक्टरांनी आपल्याबरोबर आणलेला इस्राइलचा उभा लांबट नकाशा भिंतीवर लावण्याचा यत्न केला. भिंतीतील फळ्याच्या फटीत सरकवून त्यांनी तो बसवून पाहिला; पण तिथे फट नव्हती. डॉक्टरांची ही खटपट पाहून श्रोत्यांतील तिघे-चौघे फळ्याशी येऊन नकाशा कसा टांगता येईल ते बघू लागले व चर्चा करू लागले. त्यांतले एक-दोघे इंजिनिअर होते की काय मला ठाऊक नाही. अर्थात अखेर नकाशा टांगला गेला; पण ज्या देशात एक नकाशा भिंतीवर टांगण्यास चार तज्ज्ञ लागतात तो देश मागे पडावा यात नवल काय ?

या लहानशा गोष्टीवरून मोठं तात्पर्य काढावयाचे तर असे म्हणता येईल की, सर्वसाधारणपणे आपल्या देशात विद्वानांना हाताने काम करावयास नको असते व पायाने चालण्यास नको असते. म्हणूनच नकाशा टांगण्याचे प्रॅक्टिकल येताच जरा धावपळ झाली. एकदा इथे आलेल्या एका ब्रिटिश प्राध्यापकाला मी वाङ्मय सोडून सर्व प्रश्न विचारले. तेव्हा त्याने जे सांगितले ते त्याने इतरत्र कोठे सांगितले असण्याचा संभव नसल्यामुळे मी इथे सांगतो. त्याने जेव्हा म्हटले की इथं कुणीही केव्हाही उठतो व दुसऱ्याकडे गप्पा मारावयास जातो, ही पद्धत इंग्लंडमध्ये नाही. तेव्हा संध्याकाळी तुम्ही काय करता असा प्रश्न मी विचारला. ते म्हणाले, " मी घरी येताच चहापाणी करून तळघरात जातो व तिथे माझे हौशीचे काम –म्हणजे सुतारकाम–करतो. आमच्या घरातील खुर्च्या, टेबले, पलंग, स्टूल, मांडण्या सर्व मीच बनविले आहे. सगळ्या फर्निचरची मीच दुरुस्ती करतो. आमच्याकडे प्रत्येकाला असा एक नाद असतो. त्यामुळे संध्याकाळी कुठे जावयाचे हा प्रश्नच येत नाही. "

इस्राइलवरील व्याख्यानाचे सार असे आधीच कळल्यामुळे वाचकांना वाटेल आता हा लेख का वाचावयाचा ! पण मी अनाहूत काढलेले हे सार आहे. व्याख्यात्यांचे सार ऐकावयाचेच आहे.

□

डॉ. गुजर (साने गुरुजी रुग्णालय) यांचेबद्दल मागच्या एका लेखात येऊन गेलेच आहे. डॉ. गुजर हे परवा इस्राइल देशाचा दोन आठवड्यांचा शेतीविषयक दौरा करून आले. नकाशा टांगून झाल्यावर आपल्या व्याख्यानाला आरंभ करीत ते म्हणाले,

" दोनशेसाठ मैल लांब व सात ते दहा मैल रुंदीचा हा छोटासा देश आहे. आज त्याची जी प्रगती दिसते ती अठ्ठेचाळीस सालानंतरची आहे असे धरले जाते; पण १८८० सालापासून त्याची तयारी सुरू होती. इ. स. १८७८ साली तिथे पहिली शेतकी शाळा निघाली. १८८८–१९०४–१९४८–१९६७–१९७३ अशा अंतराअंतरांनी जगातील देशादेशांतून विखुरलेले ज्यू झुंडीझुंडीने येत राहिले. सत्तर देशांतून पंचवीस लाख लोक आले. पूर्वीच्या काळी ससेहोलपट होऊन वेळोवेळी इस्राइलमधून हे ज्यू देशोधडीला लागले. त्यांच्या धर्मग्रंथाप्रमाणे पुन्हा सर्व ज्यू मायदेशी परत येणार होते. ज्यू कुठेही असो त्याच्या डोक्यातून आपला मायदेश गेला नाही. मध व दूध विपुल असलेल्या मायदेशात आपण जाणार ही प्रत्येक ज्यूच्या अंतःकरणात खोल रुतलेली भावना होती. दि. १४–५–४८ हा इस्राइलचा स्वातंत्र्यदिन धरतात. त्या वेळी तिथे आलेल्या तरुणतरुणी आता साठींत आहेत. तुम्ही का आलात, त्यांना विचारलं. ती म्हणाली प्रत्येक ज्यूने इस्राइलला जायचंय, देश पुन्हा ज्यूंचा करावयाचा ही पिढ्यान् पिढ्याची आम्हाला शिकवण.

वस्ती करण्यास येणाऱ्यांची वये तरुण असत. पुष्कळदा त्यांचे आईवडील श्रीमंत असत. ज्या देशात ते होते तेथे हवापाणी चांगले असे. तेथून जा म्हणून कुणी सांगितलेलेही नसे; पण आपल्याला मायभूमी हवी, या ध्येयासाठी सर्व सुखसोयी सोडून ते या रुक्ष दगडाच्या मायभूमीकडे आले. ज्यांची परंपरा व्यापाऱ्यांची, सावकारांची, कारखानदारांची त्यांनी जमीन का कसावी ? पण ते आले आणि जमीन कसू लागले. जमीन तरी कसली ? त्यातले दगडधोंडे

काढायलाच दोन तीन वर्षे गेली. काय जिद्द ! पाणी नाही – अन्न नाही; पण या ज्यू सेटलर्सना एक नक्की कळून चुकलं होतं की आपण येथे अन्नधान्यात स्वयंपूर्ण झालो नाही तर आपल्याला येथे राहताच येणार नाही !

' सेटलर्सना उत्तेजन मिळावे म्हणून, जो जिथे झोपडी बांधील त्या जागेचा तो मालक असे जाहीर करण्यात आले. झोपडी बांधण्यास व शेत तयार करण्यास मदत म्हणून नॅशनल ज्युइश फंड स्थापन केला. सेटलर्सना पंधरा ते वीस वर्षे मुदतीचे दोन टक्के व्याजाचे कर्ज त्यातून देण्यात आले. पाणी व जमीन सरकारच्या मालकीची हा कायदाच करण्यात आला. सेटलर्स एके ठिकाणी राहिले नाहीत, विखरून राहिले. चहू बाजूनी ते अरब राष्ट्रांनी वेढलेले होते. तरी पाणी व जमीन यासाठी ६० एक कुटुंबाची दूर दूर खेडी वसवली. अठ्ठेचाळीस सालच्या कायद्याप्रमाणे जगातील कुठल्याही ज्यूला येथे येऊन राहण्याचा अधिकार दिला गेला. '

डॉ. गुजर पुढे म्हणाले, ' येथील साठ टक्के जमीन वाळवंट आहे. वरच्या टोकास काय तो वीसपंचवीस इंच पाऊस पडतो. येथील प्रसिद्ध गॅलिलीचा समुद्र हा फक्त खडकवासल्याच्या तळ्याएवढा आहे आणि प्रसिद्ध जॉर्डन नदी बारा मीटर रुंद आहे. तिच्यात दोन ते तीन फूट पाणी आहे. वरील साठ्यातले पाणी पंधराशे फूट वर खेचून ते पाइपलाइनमधून तीनशे मैल दूरपर्यंत गेले आहे. अशा राष्ट्रीय योजनेतून पाणी मिळत असल्याने ते राष्ट्राने मालकीचे धरले आहे. प्रत्येकास पंधरा हजार क्यू. मि. पाणी मिळते. सर्वत्र पाइपलाइन्स खेळवलेल्या दिसतात. विहिरी खणल्या आहेत त्या तीनशे ते तीन हजार फूट खोल आहेत. खऱ्या त्या तेलासाठी खणल्या. पण पाणी लागले. अशा पाचसहाशे विहिरी आहेत. इथे तेल मिळत नाही व कोळसाही सापडला नाही. '

□

बरेच वर्षांपूर्वी इस्राइल सरकारचे एक साहित्य-कलाविषयक मासिक लेखकांना भेट येत असे, तसे मलाही काही अंक आले होते. एका अंकात काही फोटो देऊन एक लेख होता इस्राइलमध्ये बायबलकाली वस्ती चांगली होती व तो मधादुधाचा देश धरला जाई. म्हणजेच एक वेळ तिथे गुरांसाठी चारा मुबलक होता व पाणीही होते. ते पाणी जर आज शोधले तर ? ही त्या लेखातली कल्पना होती. इस्राइल तज्ज्ञानी पाण्याच्या जागा व पाण्याचे वाटप त्या काळी कसे होते हे शोधण्यासाठी जुन्या कराराचा-बायबलचा आधार घेतला. बायबलमधील माणसाच्या हालचालीतून पाण्याचे आलेले उल्लेख, कुठे एखाद्याने नदी ओलांडली, कुठे पाणी प्याला, अशा वनस्पतींच्या उल्लेखावरून बायबल-काळी कुठे शेती होती, कुठे गुरेढोरे होती, पाणीपुरवठा कुठे केला जात होता त्या जागा तज्ज्ञांनी शोधल्या. कित्येक जागी त्याना दगडी नहर सापडले, बुजलेल्या विहिरी मिळाल्या. त्याचे फोटोही मासिकात दिले होते. जो केवळ धर्मग्रंथ म्हणून धरला जाई त्यातील अनेक उल्लेख खरे असल्याचे त्यांना पुरावे मिळाले. सबंध जुना करार तज्ज्ञानी या दृष्टीने चाळला. नवे नकाशे तयार केले. उत्खनने केली. पुराणातील वांगी पुराणातच ही म्हण त्यांनी खोटी ठरविली.

आपल्याकडेही वेद, महाभारत, रामायण, पुराणे यातून उपयुक्त माहिती निघणे शक्य आहे; पण काहीचा उगीचच नास्तिक दृष्टिकोन व काहीची अतिरेकी श्रद्धा यामुळे त्या दिशेने खरे प्रयत्न होत नाहीत असे वाटते.

□

इस्राइल हा देश अरबी राष्ट्रांनी वेढलेला आहे. त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती सांगत डॉ. गुजर म्हणाले, ' कुठे ना कुठे किरकोळ चकमकी चालू असतात. हल्ला येण्याची सारखी भीती असते. येथे त्यामुळे लष्करी ट्रेनिंग प्रत्येकास घ्यावे लागते. मुलीना एक वर्ष व मुलांना दोन वर्षे लष्करी ट्रेनिंग देतात. प्रत्येक नागरिकाला महिन्यातून तीन वेळा नागरी संरक्षणाचे कामावर जावे लागते. प्रत्येक घराला तळघर केलेले असते व नागरिकांना शस्त्रे दिलेली आहेत. '

इस्त्राइलच्या लोकाच्या पराक्रमाच्या प्रभावाने आपणाकडे पुष्कळ प्रभावित झाले आहेत. अरबी राष्ट्रांच्या वेढ्यात असलेल्या या छोट्या राष्ट्राने अस्मिता टिकवून अरबाना धूळ चारावी याचे विशेष धरले जाते. ही भावना लोकात असता आपले राष्ट्रीय धोरण मात्र अरबांच्या बाजूने आहे, हे आणखी एक विशेष आहे. इस्राइलबद्दल आपल्याकडे कौतुकाची भावना असण्याचे कारण शोधणे मनोरंजक ठरेल. ही कोंडीत सापडलेल्याबद्दल वाटणारी अनुकंपा आहे का ? की आपल्याकडे आपणा प्रत्येकाला कोंडीत असल्यासारखे वाटते म्हणून ही सहानुभूति ! उदा. आपल्याकडील जातीची कोंडी. अस्पृश्याना स्पृश्यानी आपल्याला कोंडीत धरल्यासारखे वाटते. स्पृश्यातील प्रत्येक जातीला, इतर जातीच्या कोंडीत आपण आहोत असे वाटते आणि खरे म्हणजे आपला सर्व समाजच कोंडीत आहे हे लक्षात रहात नाही. ती भावना सुप्त मनात असते त्यामुळेच कदाचित कोंडीत सापडून मान उंच राखणाऱ्या इस्त्राइलचे आपणास कौतुक असावे. आसेतु हिमाचल असा अगडबब शब्दप्रयोग आपण नेहमी वापरतो, पण ही लांबी पृथ्वीवरील खंडप्राय देशाच्या मानाने काय आहे ? आपल्या भोवताली मुसलमान, ख्रिश्चन, बुद्ध, कम्युनिस्ट अशा संस्कृतीचा वेढा आहे. या संस्कृतीच्या पसाऱ्यापुढे संकुचित होत चाललेला आपला देश केवढा आहे ! आपली भारतीय संस्कृती अजून टिकून राहिली याचेच मला कौतुक वाटते व आनंदही वाटतो. सर्व प्रमुख संस्कृतीप्रमाणे आपण काही उत्तम गोष्टी मनुष्यसमाजास दिल्या आहेत. अगदी आधुनिक काळात आपण जगाला दिलेली गोष्ट म्हणजे सर्वात मोठी लोकशाही.

आज आपल्या संस्कृतीची अवस्था केविलवाणी आहे. आपण आपापसात भांडत–भीत रहात असल्याने ही गोष्ट आपल्या लक्षात येत नाही की इस्राइल देशाप्रमाणे आपण कोंडीत आहोत. किंबहुना त्याहून भयंकर कोंडीत आहोत. आपल्याला समानधर्मी असा एकही समाज बाहेर पृथ्वीवर नाही. हाक मारावी असा एकही शेजार आपणास नाही. आपण ख्रिश्चन नाही, मुसलमान नाही, बुद्ध नाही, भांडवलदार नाही, कम्युनिस्ट नाही. आपली संस्कृति समजावून द्यावी लागते.

अशा अवस्थेत आपण काय धोरणाने वागावयाचे याचा लौकरच विचार करावा लागणार आहे. डॉ. गुजर यांनी इस्राइलमधील परिस्थिती सांगताना म्हटले, ' इस्राईलमधे अरब वस्तीही आहे. अरबाना

ज्यूइतकेच स्वातंत्र्य दिले आहे. फक्त त्यांना बहुपत्नीत्वाला बंदी आहे त्यांना एकपत्नी कायदा आहे–ज्यूचा. तसेच अरबाना बाल-विवाहालाही बंदी आहे.' आत्मरक्षणासाठी आपणही असेच काही उपाय करावयाचे की त्या त्या समाजाला ज्याचे त्याचे स्वातंत्र्य देऊन टाकावयाचे किंवा त्याहून विशाल दृष्टिकोन ठेवून माणसातले हे सर्व भेदाभेद दूर करण्यासाठी जोरदार कामास लागा-वयाचे ?

□

जगातील मोठ्या देशाच्या स्पर्धेत लहान लहान देशाची संख्या वाढत आहे. स्पर्धेसाठी मोठे देश लहान देश निर्माण करतात. सर्व सहाय्य देऊन पायावर उभे ठेवतात. इस्राइल होण्यात या परिस्थितीचा फायदा मिळाला. त्यावरोबरच आणखी एक गोष्ट सिद्ध झाली की अनेक शतके दुसऱ्या देशातून राहून लोक त्या देशाशी समरस होतातच असे नाही. ज्यूना मायदेशाची इतकी दीर्घ स्मृति रहावी यात त्याची जिद्द दिसली तरी माणसातले दौर्बल्यही दिसते.

□

आपल्याकडे कुलाबा जिल्ह्यात ज्यू लोकांची विशेष वस्ती होती. माझा जन्मगाव कुलाबा जिल्ह्यातला असल्याने ज्यूविषयी फार पूर्वीपासून आमच्या कानांवर पडत आले होते. ज्यू लोकांचे बोलणे-वागणे चित्तपावनांप्रमाणे असते असा एक समज होता. ते बहुधा आपल्यासारखाच पोषाख करीत. काही गावातून त्याचे देऊळही असे. इंग्रजी राज्यात ज्यू लोकांना नोकऱ्या मिळाल्या व ती कुटुंबे अँग्लो-इंडियन लोका-प्रमाणे पेहराव व वागणे ठेवू लागली. माझ्या एका गिऱ्हाइकाची तरुण मुलेमुली अगदी ख्रिश्चन वाटत; पण त्यांचे म्हातारे आई-वडील आपलाच पोषाख ठेवीत व शुद्ध मराठीत बोलत. आपल्यात जातिभेद नसता तर हे लोक केव्हाच आपल्यात मिसळून गेले असते; पण वेगवेगळ्या जातीप्रमाणे ज्यूची जातही वेगळी जगत राहिली. चाळीस वर्षा-पूर्वी बाने इस्राइल तरुणानी–मला वाटते–त्याच नावाचं मराठी मासिक काढलं होतं त्याचा एक अंक मला भेट म्हणून आला होता. त्या अंकातले लेख किंवा कविता आता मला आठवत नाहीत. त्यात ज्यूत्वाचा व मराठीचा दोन्ही अभिमान होते असे आठवते.

इस्राइल देश ज्यूना मोकळा होताच या ज्यू लोकात खळबळ उडाली. इतक्या शतकां-तलं येथील वास्तव्य सोडून देवदत्त देशात जाणे ही साधी गोष्ट नव्हती. युरोप, अमेरिका वगैरे देशातील ज्यूनी इस्राइलला जाणे वेगळे व भारतासारख्या परतंत्र देशात राहिलेल्या ज्यूंनी इस्राइलला जाणे वेगळं. त्या वेळी कोकणात किती ज्यू होते व किती गेले याची आकडेवारी तेव्हाही आलेली मला आठवत नाही. त्या मासिकाचे काय झाले हेही ठाऊक नाही; पण पाखरे येऊन रहा-वीत व जावीत तसे ज्यू लोक आले, राहिले नि गेले. तिथे गेल्यावर काही दिवस काळे ज्यू म्हणून त्यांना वेगळी वागणूक मिळाली असावी. कारण एकजण मला इस्राइलमधे काळा–गोरा भेद केला जातो असे म्हणाला होता.

जात सर्व एक असली तरी देशपरत्वे त्यांच्यात आलेल्या विभिन्नतेचा प्रश्न इस्राइल लोकानी, येणाऱ्या लोकाना काही दिवस कँपमधे हिब्रू भाषा शिकवूनच आत धाडा-वयाचे, असा कायदा करून सोडविला. तसेच पाण्याचे केले. राष्ट्राने पाणीपुरवठ्याची हमी घेतली. आलेल्या प्रत्येक सेटलर कुटुंबाला घर, अडीच ते दहा एकर शेती, पाच गाई व कोंबड्या असे दिले जाई. डॉ. गुजर म्हणाले, 'आज इस्राइल नव्वद टक्के स्वाव-लंबी आहे. शेतीउत्पन्नातील एकतृतियांश उत्पन्न बाहेर देशी जाते. पाणी फारच मर्या-दित असल्याने तेथे कालवा–पद्धत घेतली नाही. नळ केले. पाण्याचा अत्यंत काटकस-रीने वापर होतो. सांडपाणी शुद्ध करतात; पण ते कपाशीला वापरतात. रोग उद्भवू नयेत म्हणून फळे किंवा धान्यासाठी वापरीत नाहीत. ऐंशी शेतकऱ्यामागे, शेतकऱ्यांस सल्ला देणारे एक रिजनल सेंटर आहे. ते अतिशय तत्पर आहे. प्रत्येकाला द्यावयाचे पाणी कंप्युटरवर कंट्रोल केले आहे. पैसे देणारी पिके प्लॅस्टिक छपराखाली काढतात. तिथे द्राक्ष, मुसुंबी, गुलाब, कापूस ही पिके सर्रास निघतात.'

अर्थातच इस्राइल म्हणजे रामराज्य किंवा स्वर्ग समजू नये. तिथे महागाई भयंकर वाढली आहे व आता चोऱ्याही होऊ लागल्या आहेत. पूर्वी येथे आलेला एक इस्राइली अधिकारी तज्ज्ञ म्हणाला, 'आम्हाला गंगा द्या आम्ही इस्राइलचे नंदनवन करून दाखवू.' त्याच्या या वाक्याचे आपल्याकडे तेव्हा खूप कौतुक झाले. दोनशे मैल लांब व सात-आठ मैल रुंदीच्या देशात गंगा नेली तर तिथे दलदलच होईल हे तेव्हा कुणाच्या लक्षात आले नाही. हे मी आता लक्षात आणून देऊ इच्छितो. उगीच कुणी तरी येऊन आम्हाला काही तरी सांगावे व बावळट ठरवून जावे हे आता बंद झाले पाहिजे.

□


**NEW TITLES RECEIVED**

| | | |
|---|---|---|
| 1) | Man Watching – ( Study of behaviour of man-Body Language & Signals )–Desmond Morris– | Rs. 91/10 |
| 2) | An Eye for Cricket – ( Cricket )–Eagar Patrick & Arlott John. | 130/— |
| 3) | Last Days of The Morarji Raj – Barun Sengupta | 35/— |
| 4) | SS–GB – Best-Seller ( Spy story )—Len Deighton | 2·20$ |
| 5) | James Bond And Moonraker — ( Thriller )— Christopher Wood | 18/— |
| १) | अहिताग्नी राजवाडे – ' आत्मवृत्त ' | रु. ४०/— |
| २) | बँको–अनुवाद–रवींद्र गुर्जर | २०/— |
| ३) | गीर गिरनार गरबा – ( प्रवासवर्णन )—सौ. मेधा काळे | १८/— |
| ४) | त्रिशंकू – ( कादंबरी )—अरुण साधू | ३०/— |
| ५) | जगावेगळी माणसं – ( मुलाखत )—गिरिजा कीर | २०/— |

* Cultured people are afraid to touch a lovely book ! But they are not afraid to read and assimilate it ! !

**फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०.**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि श्रीमती इंदिरा गांधी

श्याम रा. केळकर

"राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आणि 'श्रीमती इंदिरा गाधी' या दोन शक्ती एकत्र आल्या तर–नथिंग लाइक दॅट्–त्यासारखी उत्तम गोष्ट नाही–" माझा एक मित्र म्हणाला. अशाच प्रकारे आणखी दोघानी प्रतिक्रिया व्यक्त केली.

या विधानावर मी विचार करू लागलो. हे विधान निश्चितच विचार करण्यासारखे आहे. लेखाच्या प्रारंभीच मला हे सांगितले पाहिजे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी मी कधीही संबंधित नव्हतो आणि राष्ट्रीय स्वयसेवक संघाचा अतिद्वेष्टा व अतिचाहता यातील मी कोणीच नाही.

या विधानावरून एक गोष्ट ताबडतोब लक्षात येते ती अशी की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील लोकात श्रीमती गाधीबद्दल सुप्त आदर असण्याचीच दाट शक्यता आहे. अर्थात ज्या मित्राने हे उद्‌गार काढले तो संघातील होता असे मला म्हणावयाचे नाही. पण या दोन शक्ती अगदीच विरुद्ध टोकाच्या आहेत असे त्याला वाटत नसावे. हे म्हणणे कितपत योग्य आहे याचा विचार करू या.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक हिंदुत्ववादी संघटना आहे. हिंदूचा इतिहास, धर्म, देवळे, सस्कृती याचा संघीयाना फार अभिमान असतो. श्रीमती गाधी या काश्मीरी ब्राह्मण असून त्या कट्टर ब्राह्मणवादी आहेत ही गोष्ट लपून नाही. श्रीमती गांधीच्या कारकीर्दीतील जवळजवळ सर्व राज्याचे मुख्यमंत्री ब्राह्मण होते. १९७२ च्या निवडणुकीत श्रीमती मृणाल गोरे यानी ज्या पराजपे यांचा पराभव केला ते पराजपे महाराष्ट्रात मुख्यमंत्री असावे असे गांधींच्या मनात होते. श्रीमती गांधी याचा हा ब्राह्मणधार्जिणेपणा हा संघातील लोकाना गाधीबद्दल आपुलकी वाटण्यासारखा आहे, यात शंका नाही.

श्रीमती गांधी या दिसायला मुस्लिमधार्जिण्या आहेत. त्याच्या डाव्या बाजूला मीर कासीम, उजव्या बाजूला अतुले, पुढे मौलाना बहुगुणा व मागे शाही इमाम बसू शकतात. संघातील लोकाना अस्वस्थ करणारी ही घटना आहे, यात शंका नाही. पण श्रीमती गांधी या अजिक्य राजकारणी आहेत व त्यानी शाही इमामला कितीही आश्वासने दिली तरी वाटाण्याच्या अक्षता पण तितक्याच कुशलतेने दिल्या जातील, याची पण पुष्कळांना खात्री वाटते. म्हणजेच या मुद्द्यावरून श्रीमती गाधीचे व सघीय लोकाचे भांडण होण्याचे काहीच कारण नाही. १९७१ ला पाकिस्तानचा निर्णायक पराभव श्रीमती गांधीनीच केला व म्हणून त्या गाधी, नेहरू यांचे माळेतील मणी नाहीत, इतकेच नव्हे तर त्या कट्टर हिंदुत्ववादी आहेत असेच पुष्कळांचे मत आहे. शंकराचार्यांचे आशीर्वाद मागण्यात त्या अनमान करत नाहीत. देऊळ दिसले की, हात जोडण्यास त्या विसरत नाहीत. गाधी व संघप्रेमी यांचे नाते येथे पूर्णपणे जुळते. विशेषत: समाजवाद्यांचा मुस्लिमधार्जिणेपणा त्याना फार धोकादायक वाटतो.

भारत हे सैनिकीदृष्ट्या बलशाली राष्ट्र असावे असेच सावरकरापासून सर्व कट्टर हिंदुत्ववाद्याना वाटते. सामाजिक समता, आर्थिक प्रगती, जातिभेदविरहित समाजरचना याच्याबद्दल जितके बोलले जाईल त्यापेक्षा जास्त 'बलशाली' असण्यावर हिंदुत्ववादी व सघवाद्याचा भर असतो. या दृष्टीनेही श्रीमती गाधीशी त्याचे मतभेद असणार नाहीत 'भूतानने देखील युनोत आपल्या विरुद्ध मत दिले' हे श्रीमती गांधींचे उद्‌गार निषेधार्ह आहेत असे वाजपेयींना वाटले तरी सर्वसामान्य सघजनांना वाटतील असे नाही.

संघजनाना लोकशाही ही भारतासाठी आवश्यक अशी राज्यपद्धती आहे असे वाटत नाही. असे वाटत असल्याचे त्यांच्या लिखाणातून कोठेही डोकावत नाही. श्रीमती गांधी याचे लोकशाहीवर कितपत प्रेम आहे हेही जगजाहीर आहे.

म्हणजेच वरील सर्व गोष्टींचा विचार करता श्रीमती इंदिरा गांधी व राष्ट्रीय स्वयसेवक संघ या शक्ती एकमेकाजवळ येणारच नाहीत असे वाटायचे बिलकूल कारण नाही असे लक्षात येते. उलट दोघाना एकमेकाबद्दल आपुलकी वाटावी असे किती तरी घटक अस्तित्वात आहेत असेच लक्षात येईल.

राष्ट्रीय स्वयंसेवक सघासारखी बलशाली संघटना पाठीमागे असून जनता पक्षाचा दारुण पराभव कसा झाला ? काही लोकाना याचे आश्चर्य वाटते. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनता पक्षाच्या मागे होता असे मानणेच चुकीचे आहे. बाळासाहेब देवरस यांनी वारंवार संघ ही राजकीय संघटना नाही असे जाहीर करताना संघस्वयंसेवक आपल्याला योग्य वाटेल त्या उमेदवाराचा प्रचार करण्यास मोकळे आहेत, असे सांगितलेले आहे. संघाचे विरोधक, संघावर बंदी घालण्याचे समर्थन करणारे, अशाचे पराभवासाठी मात्र प्रयत्न झाल्याचे दिसते. मृणाल गोरे, रामधन, कृष्णकात, मोहन धारिया याचा पराभव करण्यात सघाला अधिक स्वारस्य असावे. श्रीमती इदिरा गाधींचा पराभव व्हावा असे संघाचे उद्दिष्ट असावे असे कधीही भासले नाही. १९७७ च्या निवडणुकीत अनेक संघस्वयंसेवकानी संघावरील बंदी उठवण्याचे उद्दिष्टपूर्तीसाठी जनता पक्षाला पाठिंबा दिला. यावेळी तसा प्रश्न अस्तित्वातच नव्हता.

जनता पक्षाची धोरणे आणि रा. स्व. संघाची धोरणे यात साम्य असण्याचे काहीही कारण नाही. जनता पक्षाचे सर्वात प्रधान उद्दिष्ट लोकशाही अबाधित राखणे हेच आहे व जनता पक्षात विलीन झालेला जनसंघाचे वरिष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवानी व मुंबईतील खासदार राम जेठमलानी, सुब्रह्मण्यम् स्वामी, रामभाऊ म्हाळगी व रत्नागिरीचे श्री. परूळेकर यानी आपल्या वर्तनाने हेच सिद्ध केले आहे. हे नेतृत्व संघातून वरती आले असून संघजनाची शिस्त, कठोर आत्मविश्वास हे गुण त्यांनी टिकविले आहेत; पण लोकशाही-निष्ठा व जनहित यावरच त्यांनी अधिक लक्ष पुरविले असून पुरोगामी धोरणांचा पाठपुरावा केलेला आहे.

जनता पक्षात विलीन होऊन माजी जनसंघीयांनी चूक केली, आता त्यानी बाहेर पडावे असे काहीना वाटते— हा विचार सर्वथा चुकीचा आहे. आता दोर कापलेले तर आहेतच पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकगठ्ठा मते जनसंघ पक्ष स्थापन झाला तर पुनः त्याला मिळतील हा विचार चुकीचा आहे. श्रीमती गांधी व चरणसिंग *(ते स्वत. कट्टर हिंदुत्ववादीच आहेत)* यांचे प्रभावाने रा. स्व. संघाच्या निष्ठा विचलित झाल्या. १९६९ च्या निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये ९८ जागा मिळवणाऱ्या जनसंघाला १९७२ ला उ. प्रदेशमध्ये फक्त ४५ जागा मिळाल्या होत्या. म्हणजेच जनसंघाची ताकद कमी होऊ लागलेलीच होती.

पं. दीनदयाळ उपाध्याय आणि त्यानंतर वाजपेयी यानी जनसंघाचे धोरण लोकाभिमुख करण्यास सुरवात केली. देशात पुरोगामी लोकशाही विचारांचा एक पक्ष असणे आवश्यक आहेच आहे व तो पक्ष फक्त ३१ *जागा मिळवलेला असला तरी जनता पक्षच आहे.* जनता पक्षाला ३ कोटी ८५ लाख मते मिळाली आहेत. ही मते थोडी नाहीत व ही पूर्ण विचाराती मिळालेली मते आहेत. विचाराना मिळालेली ही मते आहेत. जनता पक्षातून भजनलालसारखी मंडळी बाहेर पडत आहेत. या मंडळीमुळे मते कमी झाली. जनता पक्षाला मते मिळाली ती तो हिंदुत्ववाद्याचा पक्ष म्हणून नव्हे किंवा मिळाली नाहीत याचे कारण पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे अस्तित्व म्हणून नव्हे. तर भजनलाल, शामराव पाटील, चिमणभाई पटेल असे लोक जनता पक्षात होते म्हणून. *जनता पक्ष म्हणजे जनसंघ व जनसंघ म्हणजे* संघ असे इंदिरा गांधी म्हणत असल्या तरी तसा प्रकार नाही. जनसंघ अस्तित्वातच नाही. बलराज मधोकाचा पक्ष कदापी पुढे येणे शक्य नाही व जनता पक्ष व संघ *या* सर्वस्वी भिन्न संघटना आहेत. जनता पक्षातील काही व्यक्ती संघात व संघातील काही व्यक्ती जनता पक्षात असणे आक्षेपार्ह नाही. माजी कॉंग्रेसजन जर जनता पक्षात चालत असतील तर संघीयाना खड्यासारखे वगळण्यात अर्थ नाही. वाजपेयी, अडवानी यानी दाखविलेला कार्यक्षम व प्रामाणिक कारभारामुळे जनतेला त्याचेबद्दल अपार आदर आहे. या दोघांनी आपली निष्ठा सर्वस्वी जनता पक्षाला वाहिलेली आहे. हे त्याच्या कृतीवरून लक्षात येते. दुहेरी निष्ठा असलेली मंडळी आता जनतामधून कॉंग्रेस (I) मध्ये चाललेली आहेत. तेव्हा दुहेरी निष्ठांचा प्रश्न जनतेवरच सोडून द्यावा.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही जनमानसात लोकप्रिय असलेली संघटना नाही. तिला विनाकारण मोठा भाव दिला जात आहे. लोकशाही व समाजवाद आणणे हे काही संघाचे उद्दिष्ट नाही. संघ प्रखरपणे एकाधिकारशाहीविरोधी नाही. भ्रष्टाचारविरोधातदेखील तो पुढे आहे असे वाटत नाही. (वीरेन्द्रकुमार सकलेचांना काढून टाकावे असे देवरस कधीच म्हणाले नाहीत. अर्थात संघ राजकारणात नाही असाच खुलासा देवरस करतील याची मला खात्री आहे.) तेव्हा जनता पक्ष व संघ पूर्णपणे भिन्न आहेत हे समजून घेतले पाहिजे.

श्रीमती इंदिरा गांधी व संघ एकत्र आल्यास यासारखी उत्तम गोष्ट नाही, हे अर्थातच मला पटत नाही. यासारखा दैवदुर्विलास कोणताही नाही.

अंती जनता पक्षात राहणार आहेत ते पूर्वाश्रमीचे संघटना कॉंग्रेसजन, माजी समाजवादी व पुरोगामी विचारसरणीचे माजी जनसंघीय आणि आमच्यासारखे बुद्धिवादी, लोकशाहीप्रेमी लोक. *राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची केडर मार्क्सवाद्यांसारखी असली तरी* तिचा जनता पक्षाशी काहीही संबंध आता राहिलेला नाही. हरयाना आणि हिमाचल प्रदेशात पक्षातर करणाऱ्यात माजी जनसंघीयांची संख्यासुद्धा भरपूर आहे. तेव्हा संघातील संस्कार, चारित्र्य, शील, सदाचार याचे संवर्धनच करतात, असे काही म्हणावेसे वाटत नाही. अर्थात हा दोष संघाकडेच आहे असे नाही. अंतिम दोष व्यक्तीचाच आहे.

'अरस कॉंग्रेस'चा महाराष्ट्रात पराभव झाला याचे कारण यांचा इंदिरा विरोध सच्चा आहे, हे कळणे शक्य नव्हते. आता त्याचा प्रोबेशन पीरिअड सुरू झाला आहे. अजूनही दोन वर्षभर जे अरस कॉंग्रेसमध्ये राहातील ते पण अंती जनता पक्षाचे मित्र ठरणार आहेत. लोकशाहीचा लढा गरीब देशात लढणे कठीणच असते; पण कॉंग्रेस पक्षामुळेच देशात मूलतः लोकशाही अस्तित्वात आली आहे. गांधी–नेहरूंची परपरा टिकविणे हेच जनता पक्षाचे ध्येय आहे. जगजीवनराम, चरणसिंग, मोरारजी, देवरस, चंद्रशेखर असले व्यक्तीवादी राजकारण चालवून काहीच मिळणार नाही.

सत्तेसाठी शॉर्ट–कट् घेणे हे नेहमीच धोकादायक असते हे जनता पक्षाने ओळखावे. १९६७ सालपर्यंत विरोधी पक्षांची ताकद वाढती राहिली याचे कारण विरोधकानी शॉर्ट–कट् मारले नाहीत. १९७१ पासून सत्तेची स्पर्धा लागली. त्यात तत्वाचा सदोदित बळी गेला. विरोधी मते विचाराना मिळणारी मते होती. कार्यकर्त्यांमुळे मिळणारी मते होती. ती मते पण जाऊ लागली.

असो. तेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक सघाची स्तुती किंवा निंदा या दोघांचाही आपण त्याग केला पाहिजे व संघावर बिलकुल विसंबून राहता कामा नये. हा धडा आपण घ्यावा. संघ व इंदिरा गांधी एकत्र न आले तर उत्तम पण कोणत्याही संकटास तोड देण्यास सिद्ध असले पाहिजे.

□

# अमरावती ते नागपूर
# समता अभियान

६ डिसेंबरचा औरंगाबाद येथील विद्यापीठ नामातराचा सत्याग्रह पार पडला खरोखर अभिमान वाटण्याजोग्या शांततेने ४०-५० हजार सत्याग्रहींनी सत्याग्रह केला. नागपूरचे एकमेव गालबोट वगळता. पुढील कृती डोळ्यासमोर नसल्याने आदोलन थडावलं. नामातरवादी कृतिसमितीने नागपूरचे विधानसभेचे अधिवेशन डोळ्यापुढे ठेवून नागपूरला २० जानेवारीला 'समता परिषदेचे' आयोजन केले होते.

संघर्ष वाहिनी प्रथमपासूनच नामातर आदोलनात सक्रियपणे सहभागी होती. हे आंदोलन हा समतेचा लढा असून 'समता' हे साध्य आहे व नामांतर हे एक त्याचं साधन आहे, या भूमिकेतून आम्ही या आंदोलनाकडे पहात आलो. अशा आदोलनाचे थंडावलेले स्वरूप पाहून मनाला खंत वाटत होती. एका वेगळ्या कृतीची आवश्यकता भासत होती. या पार्श्वभूमीवर 'समता परिषद' नजरेसमोर ठेवून वाहिनीने 'समता अभियानाची' आखणी केली. 'अभियान' विदर्भात काढण्यामागील उद्देश होते–(१) नागपूरची समता परिषद, (२) ६ डिसेंबरची नागपूरमधील घटना आणि त्यामुळे बनलेले तंग वातावरण. या जोडीला नामातरामागची भूमिका विस्तृत प्रमाणावर मांडावी, सवर्णामधील गैरसमज दूर करावेत व दलित आणि सवर्ण दोघानाही समतेच्या भूमिकेतून या आदोलनात मोठ्या प्रमाणात सहभागी करण्याचा प्रयत्न करावा, हे पण उद्देश होते.

वरील भूमिका समोर ठेवून 'अभियानाची' आखणी केली. अमरावती ते नागपूर हे १५० कि. मी.चे अंतर ७ दिवसात चालून जायचे व २०जानेवारीला नागपूरमध्ये पोचावयाचे असे ठरले पायी जाताना गावागावातून वरील भूमिकेवर प्रबोधन करायचे, बैठका, चर्चा, जाहीर सभा घ्यावयाच्या असे ठरले. राहण्या, जेवणाची व्यवस्था गावकऱ्यावर सोपवायची, आपण बरोबर शिधा घ्यावयाचा नाही.

१३ जानेवारीला दुपारी डॉ. आंबेडकराच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अमरावतीहून अभियानास सुरुवात झाली. महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यातून वाहिनीचे प्रमुख २५ साथी यात सामील झाले होते. रोजचा कार्यक्रम आखलेला होता. साधारणपणे रोज २५ कि. मी. चालायचे व तेवढ्या अंतरावरील गावात रात्रीचा मुक्काम करावयाचा. दिवसा वाटेत येणाऱ्या गावातून नामांतरामागील भूमिका विशद करत, सभा घेत मुक्कमाच्या गावी पोचावयाचे. चालताना पत्रके, पोस्टर्स वाटावयाची. गावात पोचल्यावर प्रथम ३–४ जणाचे गट पाडून गावातून फिरावयाचे असे ठरले. त्याप्रमाणे वाटेत गाव लागले की, ३–४ जणांच्या टोळ्यात विभागून गावातील प्रत्येक वस्तीत संपर्क साधला जायचा. सवर्ण व दलित दोन्ही वस्त्यात संपर्क साधण्यावर सारखाच जोर होता गटागटाने हिंडून लोकाना हा प्रश्न समजाविला जाई. त्याच्याशी चर्चा केली जाई व शेवटी सवर्ण व दलिताची मिळून एक बैठक अथवा सभा घेतली जाई. मुक्कामाच्या गावी राहण्या, जेवणाच्या व्यवस्थेसाठी सवर्ण व दलित दोन्हीकडे संपर्क केला जाई. दलित वाड्यातून तर आनंदाने स्वागत केले जाई. लोक उत्साहाने व्यवस्था करीत. पण त्याचू जोडीला सवर्णांनीही व्यवस्था करावी म्हणूनही खास प्रयत्न केले गेले. कारण या आदोलनात जास्तीत जास्त सवर्णांना आपण सहभागी करू शकलो तर आदोलन वेगाने पुढे जाईल ही भूमिका.

ज्या गावात बऱ्यापैकी दलित वस्ती असे तेथे उत्साहाने स्वागत होई. सभेची, बैठकीची व्यवस्था केली जाई. परंतु दोन गावात असाही अनुभव आला की, दलिताएवढ्याच उत्साहाने सवर्णांनी आमची सर्व व्यवस्था केली. ती सवर्ण मंडळी चक्क नामांतरविरोधी होती पण त्यानी सभेची, बैठकीची व्यवस्था केली. राहण्याची व जेवणाची सोय केली.

### अटक

अशा उत्साहाच्या वातावरणात गावामागून गावे मागे टाकीत वाहिनीचे समता सैनिक नागपूरकडे कूच करीत होते. अर्थातच आम्हाला नागपूरमध्ये पोचू न देण्याचे सरकारने ठरविले होते. अमरावतीपासून सतत पोलिस बरोबर होते. अभियानाच्या सहाव्या दिवशी म्हणजे, १८ जानेवारीला नागपूरपासून ३० कि. मी. वर 'बाजारगाव' येथे पोलिसानी आम्हाला अडविले. ३७(३) कलमाचा भंग केला या आरोपाखाली २० समता सैनिकांना अटक केली गेली. (१५ मुलं, ५ मुली) पोलिसाच्या व्हॅनमध्ये बसल्यावर सगळ्याचा उत्साह आणखी वाढला. घोषणा, गाणी याना ऊत आला. आम्हा सर्वांना 'काटोल' येथे मॅजिस्ट्रेटसमोर उभे करण्यात आले. काटोलमध्ये व्हॅन पोचल्यावर तेथील एस. टी. स्टॅन्डवर झालेली सभा चिरस्मरणीयच होय. व्हॅनमधून पत्रके वाटू लागल्याबरोबर लोकाची तोबा गर्दी जमली व तेथेच आम्ही व्हॅनमधून भाषणे ठोकली. काटोलचे वातावरण एकदम बदलून गेले.

मॅजिस्ट्रेटने १ दिवसाची कस्टडी दिली. १९ जानेवारीला कोर्टात हजर करावयाचे होते. त्या दिवशी सकाळपासून कस्टडीवर लोकाची रीघ लागली. दलित पॅन्थरची पोरं दिवसभर आमच्यासाठी खपली. ४ वाजता मॅजिस्ट्रेटसमोर उभे केले गेले. त्याने शिक्षा सुनावली १० रु. दंड प्रत्येकी. दंड न भरल्यास ५ दिवसाची साधी कैद–अर्थातच आम्ही दंड भरण्यास नकार दिला. तेथून आम्हाला नागपूर मध्यवर्ती कारागृहात नेण्यात आले. २३ तारीखपर्यंत आम्ही २० जण आत होतो. यामध्ये १५ मुलं व ५ मुली होत्या. जेलमधील वेळेचा उपयोग अर्थातच चर्चा, बैठका यासाठी करण्यात आला. सरकारी खर्चाने आम्हा कार्यकर्त्यांचे एक चार दिवसाचे शिबिर पार पडले.

२३ जानेवारीला सगळ्याना सोडण्यात आले. २० जानेवारीची संकल्पित 'समता परिषद' झालीच नाही. त्यामागील कारणात मी शिरत नाही. पण समता–अभियानाचे मूल्यमापन जरूर करू इच्छितो. अभियानात आलेले अनुभव, त्यातून निर्माण झालेले काही प्रश्न पुढे ठेवत आहे.

१. नामातर प्रश्नावर विदर्भातील सवर्णांच्या भावना जास्त तीव्र नाहीत. अगदी टोकाला जाऊन विरोध करण्याची त्याची भूमिका नाही. पण आंदोलनाकडे त्याची सहानुभूतीही नाही.

२. 'लाँगमार्च'मुळे दलितांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागरूकता आहे. आदोलनात हिरीरीने पडण्याची त्याची तयारी आहे. पण यामध्ये जवळ जवळ सगळे नवबौद्ध आहेत. फार मोठ्या संख्येने आहेत. पण इतर दलितसमाज फार मोठ्या संख्येने नाही. सवर्णांचीही संख्या आदोलनात कमी असल्याने लोकाची समजूत अशी आहे की, हे आदोलन बौद्धांचे आदोलन आहे. हा गैरसमज दूर करण्याची व हे समतेचे आंदोलन आहे हे समजाविण्याची आवश्यकता प्रकर्षाने जाणवली.

३. नामांतराला विरोध करणाऱ्या सवर्णांचा रोख नामातरावर नाही. खरा राग, चीड त्याच्या मनात आहे ती 'राखीव जागा' व 'सवलती' या बाबतीत. या प्रश्नावरच प्रत्येक गावात जास्त चर्चा होई. सवर्ण येथपर्यंत येत की, नामातराला आमचा पाठिंबा आहे, पण सवलतीना मात्र विरोध आहे.

वरील मुद्दे समोर आल्यावर जाणवतं ते हे की, आज आवश्यकता आहे प्रबोधनाची. आंदोलनाचे सरकाराभिमुख स्वरूप बदलून ते लोकाभिमुख बनविले पाहिजे. सवर्णांचा व इतर दलित समाजाचा जास्तीत जास्त सहभाग या आदोलनात राहिला तरच ते समतेचे आदोलन बनेल. अन्यथा ते फक्त नामांतराचे आदोलन होईल. □

## वार्तापत्र तिसरे

# न होणाऱ्या तिसऱ्या महायुद्धाचे पडघम वाजत आहेत

सौ. माधुरी बापट (अमेरिका)

आज २५ डिसेंबर ! होस्टेजेसच्या बंदिवासाचा बावन्नावा दिवस !

अजून आयातोलाचा हट्ट संपत नाहीये. एरवी धुंद असणारं ख्रिसमसचं वातावरण ह्या प्रकरणानं गढूळ बनलय्. सर्व आसमंत 'We wish you a Merry X'mas ( ३ वेळा चढत्या सुरात ) and Happy new year !' च्या सुरानं भरून गेलाय्. पण त्यात एक करुण लकेर नकळत मिसळली आहे.

होस्टेजेसचे नातेवाईक उराशी खोटी आशा धरून आहेत. उत्तर ध्रुवावरून नाताळची बक्षिसं घेऊन निघणारा सँता आपल्यासाठी यंदा आपला नवरा, मुलगा, वडील घेऊन येईल अशी मोठ्ठी आशा होती. मोठ्या उत्सुकतेनं सकाळी उठून नाताळवृक्षाखाली पाहिलं पण चांगलीच निराशा झाली. सँतापण उदास चेहऱ्यानंच उभा होता. आयातोलापुढं त्याचीही डाळ शिजली नाही.

नाताळचे बाराही दिवस होस्टेजेस्ना हजारोनी ग्रीटिंग कार्डस् मिळत होती भेटीदाखल ! तीन पाद्र्याबरोबर नाताळपण साजरा झाला– बंदिवासातच ! व्हाइट हाऊस समोरचा नाताळवृक्षही यंदा– बिनदिव्याचा निर्जीवच राहिला. चर्चमधून रोज होणारा घंटांचा गजर येशूला जागं करायला अपुरा ठरतोय. न्यूजर्सीत फडकणारा ९०' × ६०' आकाराचा भव्य रेशमी नॅशनल फ्लॅग १९ डिसेंबर– Unity day– ची आठवण करून देतोय.

होस्टेजेस्ना सोडवण्याची चाललेली कार्टरची सर्व तपश्चर्या निष्फळ ठरायची भीती वाटतेय.

त्यातच New Year Eve आली आणि गेली ! दरवर्षीप्रमाणे यंदापण न्यूयॉर्कच्या टाइम स्क्वेअरमध्ये ३१ डिसेंबरला रात्री बरोबर बारा वाजता ५ मिनिटं अंधार गुडूप होऊन लोकांच्या जल्लोषात नि बँडच्या आवाजाच्या स्वागतानं नवीन वर्ष उजाडलं ! नव्या वर्षाच्या पिपाण्या वाजल्या. १ जानेवारी १९८०. बंदिवासाचा ५९ वा दिवस ! नवीन वर्षाचा– नवीन दशकाचा १ ला दिवस ! नव्या आशा घेऊन उगवला ! गेल्या वर्षातल्या दुःखद घटनांवर काही काळापुरता तरी पडदा पडलाय् की, त्याने सर्व वातावरणच चिघळत चालले ते समजत नाही. नवीन वर्षाचं दान खरं की खोटं पडलंय् ते आत्ताच सांगता येत नाही.

पेट्रोल–टंचाईमुळे मोटारचा रोज एक प्लँट बंद होतोय, त्यानें लाखो कामगार बेकार होताहेत नि हजारो Food–stamps वर जगताहेत.

इतके दिवस तेलावर जगणाऱ्या मिडलईस्टच्या उंटांना आता सोन्याची खा खा उठली आहे. नि रोज फुगणारा सोन्याचा भाव डोळ्यापुढे अंधारी आणतोय.

ऐन नाताळात अफगाणिस्तानात शिरकाव करून कॉम्रेडने मोठीच मूव्ह केली आहे. 'जग काय म्हणेल 'ची फिकीर त्याला पडली आहे का पाहा ! ती फक्त ह्या Free world लाच ! शेकडोनी पाकिस्तानात रेफ्यूजी जाताहेत. जगभर चाललेली रेफ्यूजीची धावपळ हीच नवीन वर्षाची भेट का ?

आणि परवाच २२ जानेवारीला एक धक्कादायक गोष्ट घडली. रशियाच्या हायड्रोजन बाँबचा जनक– अँड्रे सँकॅरॉव्ह– याला अटक केली. दुःखानं मन बधीर होऊन गेलं. मती गुग झाली. केवळ दोनच तासाच्या अवधीमध्ये केवळ दोनच बॅगा घेऊन त्या शास्त्रज्ञाने मॉस्को सोडले. गॉर्कीच्या कॉन्सेन्ट्रेशन कँपमध्येच आता आयुष्याचे उरलेले धागे मोजायचे. 'एकट्या माणसाची लढाई संपली !' एवढं एकच वाक्य उच्चारलं त्यानं. भारताविषयी कौतुकाचे उद्गार काढणाऱ्या ह्या शास्त्रज्ञाविषयी मनामध्ये नकळत आपुलकीची भावना निर्माण झाली होती.

'सगळ्या जगाची चिंता करणाऱ्या त्या नोबेल पारितोषिक विजेत्याची सुद्धा आम्ही प्रसंगी गय करत नाही' हेच कॉम्रेडला जगासमोर ठेवायचंय् का ? Human Rights हे शब्द उच्चारणं सुद्धा तिथे पाप आहे. सर्व देशानी याबद्दल त्याचा धिःक्कार केला. जगातल्या इतर कम्युनिस्ट पार्टीज्नीही निषेध दाखवला. पण त्याला कुणाचीही गरज पडलेली नाही. करार, निषेधखलिते हे फक्त अमेरिकेत किंवा भारतांत ! रशियात केवळ Action !

हा फोफावणारा कॅन्सर त्याचं मूळ उखडलं तरी बरा होणारा नाही. शहा पनाम्यातून परत इराणला गेला तरी हे संपणार नाही !

शिक्षा म्हणून रशियाचा गहू बंद केला. पण त्याला इथलेच शेतकरी विरोध करताहेत. त्यांना गव्हाच्या कमी होणाऱ्या किमती आवडत नाहीत. देशासाठीच काय पण एकूणच आयुष्यात sacrify करणं हे इथल्या मातीतच नाही. डॉलर्ससाठी शत्रूलासुद्धा धान्यकोठा कमी करणं मान्य नाही.

तीच गोष्ट खेळाडूंची. यंदाच्या मॉस्कोतील ऑलिंपिक्सवर बहिष्कार घालणं त्यांना पसत नाही. राजकारण नि खेळ यांचा तसा संबंध नाही खरा, पण एका विशिष्ट तत्त्वासाठी तो मानायला हवा. झपाट्याने पसरणारा कम्युनिझम सर्व जगाचाच घास करायला टपलाय्. त्याला कुठे तरी आळा बसायला हवा.

## इंदिरा गांधी

आणि त्यासाठीच पाकिस्तानला शस्त्रे पुरवून नि तब्बल तीस वर्षांनंतर चीनशी संबंध सुधारून अमेरिकेनं बाईंना डिवचलंय्. हे तिळपांचं दुखणं कधी संपायचं ?

तीनच वर्षांपूर्वी बाजूला केलेली बाई पुन्हा सत्तेवर आली. मोठी शर्थीची खरी ! फर्नांडिसनं वर्तवलेलं पार्लमेंटमधलं एकमेव पुरुषत्व बाईनं सिद्ध केलंन् पुन्हा !

जनता पक्षाच्या वाळाला देशाचं राजकारण सांभाळता आलं नाही म्हणून नाव ठेवण्यात काहीच अर्थ नाही. स्वातंत्र्यापासूनच विरोधी म्हणून टीका करण्यात पटाईत असलेल्यांवर देशाचा गाडा प्रत्यक्ष हाकण्याची संधीच पूर्वी मिळाली नाही. बाळपणापासून त्यात तरबेज असलेल्या बाईपुढे, त्याची तुलना कशी करावी ? पोहता न येणाऱ्याला एकदम वयाच्या तिसाव्या वर्षी समुद्रात ढकललं तर तो गटांगळ्या खाणारच !

सध्याच्या जागतिक संघर्षामध्ये बाईंची जगातल्या प्रमुख व्यक्तींमध्ये गणना होऊ लागली खरी. जनता पक्ष सत्तेवर होता तोवर इथे भारताविषयी बातम्या क्वचितच येत व त्यासुद्धा एक-दोन वाक्यात ! बाई निवडून येते म्हटल्यावर काय जादू झाली पाहा ! धडाधड बाईंच्या, भारताच्या, नवी दिल्ली बातम्या बरसू लागल्या !

बाई आल्या तशी राजधुरिणांच्या कपाळावर आठ्या उमटू लागल्या. बावळ्या मित्राचा गंभीर आजारही दुर्लक्षिला जातो, पण स्मार्ट शत्रूच्या शिंकेचीपण दखल घेतली जाते, तशापैकी.

शपथविधीची पण सविस्तर न्यूज ! भारताविषयी क्वचितच व दिल्या तरी वाईटच बातम्या देणारे CBS टेलिव्हिजन नेटवर्कनेसुद्धा साडीधारी इंदिरेची वित्तंबातमी दाखविली. अमेरिकन टी. व्ही. वर एकूणच साडीधारी बाई पाहिली की शरीरातून कशी एक वीज चमकून जाते. NBC टेलिव्हिजन भारताविषयी नेहमीच तटस्थ वाटते; पण ABC ने मात्र कमाल केली. त्याची प्रमुख वार्ताहर बार्बारा वॉल्टरने चक्क सॅटेलाइटतर्फे बाईंची मुलाखत घेतली व तीसुद्धा टेलिफोनवर. उजवा डोळा चोळत चोळत बाई कशी चतुरपणे उत्तरं देत होत्या त्याचं कौतुक वाटलं; पण पूर्वीपेक्षा खूपच निवळलेल्या व थकलेल्या वाटल्या बाई यावेळी.

तरीपण 'India will be strong, stable and independent' ह्या त्यांच्या वाक्याने त्यांच्यातला कणखरपणा चांगलाच जाणवत होता. सध्याच्या संघर्षात बाई काय भूमिका घेतात याची सर्वांनाच मोठी उत्सुकता आहे. प्रमुख वृत्तपत्रातून सुद्धा त्यांच्या हालचालीविषयी, त्यांच्या मताविषयी वरचेवर विवरण, परीक्षण वाचायला मिळतं हल्ली. 'बाई आली, आता भारतात कम्युनिझम यायला काय वेळ ?' अशा विचाराने इथले इंदिराविरोधी काळजीने त्रस्त झालेत. उलट इंदिराप्रेमी भारतीय 'हे ठीक झालं, नाहीतरी कोणीतरी असाच हवा आपल्या देशात—मेंढराना शिस्त लावणारा' अशा विचारानं त्यांच्या विजयामुळं खूष झालेत.

प्रत्येक देशाशी त्या कसे संबंध ठेवतात ह्यावर न्यूयॉर्क टाइम्स; न्यूजवीक मधले उतारे वाचून मोठी गंमत वाटली. बाई आल्याने आता कॉम्रेड तरी निर्धास्त झाला. अर्थात इंदिराबाई अफगाणिस्तान प्रकरणाने त्यांच्यावर जरा नाराजीच दाखवतात. नुकतीच पाकिस्तानबरोबर क्रिकेटची मॅचपण खेळीमेळीने झाली; पण बाई आल्यावर पुन्हा त्रियाशी वाकडेच होणार का ? पाकिस्तानला शस्त्रे दिल्यावर बाईंनी कार्टरला कडाडून विरोध दाखवला. चीनबरोबर पूर्वीचाच अलूफपणा राहणार का ?

बाई नुकतीच क्यूबाच्या फिडल कॅस्टोची भेट घेताहेत. शिवाय अमेरिकेचे सरक्षण मंत्रीही त्याना भेटताहेत, यावर काय घडते याकडे सर्वांचेच लक्ष लागलेय ! निवडून आल्यावर आठ दिवसाच्या आतच सर्व गोष्टी फटाफट हातावेगळ्या करण्याची हातोटी—त्याचं कौतुक किती करावं ?

सध्यातरी रशिया, अमेरिका दोघांनाही विरोध दाखवणाऱ्या बाई पुढे काय भूमिका घेतात ह्याविषयी खूपच उत्सुकता वाटते. नकळत कम्युनिझम आणतील की खरोखरची लोकशाही टिकवतील की पुन्हा हुकूमशहाच बनायचा प्रयत्न करतील ? सगळीच चित्रं धूसर आहेत.

गेल्या वर्षात जगातले बरेच हुकूमशहा उडाले. इराणचा शहा, निकारागवाचा समोझा, आफ्रिकेतला इदी अमीन ... भारतात हुकूमशहा बनू पाहाणाऱ्याने थोडा ताजाच इतिहास पाहिलेला बरा !

जगातल्या मोठ्या शक्तीचा डॉमिनन्स न मानता तरीपण त्यांच्याशी खेळीमेळीनं राहून बाईंनी निर्दोष, सुदृढ लोकशाही टिकवावी—ही अपेक्षा, मागणी कदाचित आयडियल ठरेल; पण तशी त्याना बुद्धी, सामर्थ्य देव देवो ही इच्छा ! काम मोठं अवघड खरं, पण मनात आणलंत तर काहीही करून दाखवतील !

## पोलिटिकल डिबेट्स

जगातले सर्वच प्रश्न जगापुढे अक्राळविक्राळ रूप घेऊन उभे आहेत. होस्टेजेसना सोडवून आणेपर्यंत अध्यक्षाना झोप येत नाहीये. अन्नपाणी गोड लागत नाहीये. प्रकरण जास्तच चिघळल्याने सर्व जगात त्यांची इमेज डागाळायची भीती आहे. तरीपण अमेरिकन्स त्यांच्याच पाठीशी आहेत.

त्यामुळं यंदाचं इथलं निवडणुकीचं वातावरण ह्या अंतर्बाह्य काळज्यांमुळे झाकळून गेलंय. नेहमीसारख्या प्रचार सभा रगत नाहीत. इराण क्रायसेसवर कुठलाच उमेदवार समाधानकारक उत्तरं देत नाही. अशा वातावरणात रिपब्लिकन पक्षच पहिलं डिबेट आयोवा प्रातात डिमॉईन इथे ५ जानेवारीला पार पडलं ते TV वर, लाइव्ह पाहायची उत्सुकता होती.

रिपब्लिकन पक्षाचे सातापैकी सहा उमेदवार हजर ! रोनाल्ड रीगनने गैरहजर राहून स्वतःच्या मोठेपणाची जाणीव करून दिली. पण त्याच्या ह्या तोड लपवेपणावर उरलेल्यानी वेळ मिळेल तेव्हा मनसोक्त टोमणे मारून घेतले.

पॅनेलचा पहिलाच प्रश्न इराणवर ! सर्वांनी Around the bush नाचून झक्क टोलवाटोलवी केली. 'बुश' साहेबाचा 'मी मी'पणा फारच वाढला होता. 'डोल'चा 'एकहाती' कारभार विशेष समाधानकारक नव्हताच. बेकरचाही पूर्वीचा जोर कमी झालेला वाटला. 'कॉनेली' साहेबाचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व डिबेट जिंकायला कमी पडलं. बाकी टोमणे मारावेत ते कॉनेलीनीच JFK च्या वेळी डेमॉक्रॅटिक पक्षात असलेला हा टेक्सासचा गव्हर्नर स्वतःच्या वयाबरोबर दो[illegible]

पक्षांतल्या मेखा पुरेपूर ओळखून आहे.

त्याच्या वयाविषयी प्रश्न विचारणाऱ्या वार्ताहरांना तोड देताना सत्तरी गाठलेला कॉनेली म्हणतो, 'माझ्या वयाचा मोठा फायदा मला आहे. त्यामुळे निवडणुकीला उभं राहू का? हा प्रश्न मला माझ्या आईला विचारावा लागत नाही!' आहे किनी कार्टर नि केनेडीना झक्क टोमणा? दोघाचे मातृप्रेम सर्वश्रुतच आहे!

सर्व उमेदवारात 'तेज' वाटले ते क्रेन नि अँडरसन! तळमळीनं बोलणारे. इराण क्रायसेस, एनर्जी क्रायसेस, महागाई, बेकारी, समान हक्क वगैरे प्रश्नावर पॅनेलचे प्रत्येक उमेदवाराना, प्रश्न, त्याच्या उत्तरावर इतर उमेदवारांच्या कॉमेंटस्! हा डिबेटचा अर्धा भाग. नंतर विद्यार्थी व सामान्य जनतेतील निवडक प्रश्न त्यांची उत्तरे व शेवटी प्रत्येक उमेदवाराचे समारोपाचे भाषण! इतकं पद्धतशीर पोलिटिकल डिबेट आयुष्यात १ ल्यादा TV वर लाइव्ह पाहायला मिळाल्याने इतकं प्रभावित वाटलं ... असं काही तरी आपल्या देशात का नाही घडत? अशात लोकशाहीचे खुंटे हलवून बळकट नाही का होत?

असंच डिबेट डेमॉक्रॅटिक पक्षाचंही पहायची उत्सुकता होती. पण त्याला कार्टरच गैरहजर राहिल्याने TV वर दाखवलंच नाही.

डेमॉक्रॅटिक पक्षाच्या इनमीन तीन उमेदवाराच्या तीन तऱ्हा! कार्टर सदोदित जबाबदाऱ्यात गुतलेला. त्याला डिबेट नि प्रचार सभांना जायला वेळ कुठला? डिबेट साभाळलं उपाध्यक्ष मॉडेल यानी नि प्रचाराचं काम रोझलीनवर सोपवून तो निर्धास्त! आणि ती सर्व जबाबदारी सास्वासुना-लिबियन-रोझलीन व्यवस्थित पार पाडताहेत.

केनेडीना चॅपक्वाडिकमुळं पुरेसा आत्मविश्वास नाही. जेरी ब्राऊनची लोकप्रियता दिवसेदिवस ढासळतीच आहे. पैसा गोळा करण्यासाठी रॉक स्टार्सची मदत घेऊन नि होमोसेक्सुअल्सना पाठिंबा देऊनही फायदा होत नाहीये.

अशा पार्श्वभूमीवरच सर्व उमेदवाराची १ ली चाचणी निवडणूक २१ जानेवारीला पार पडली! आणि त्याच्या रिझल्ट्समुळं एकावर एक धक्के बसले. सर्वांत आश्चर्यकारक निकाल लागला तो रिपब्लिकन पक्षाचा! रीगन, क्रेन, अँडरसनला बाजूला सारून बुश चक्क ३३% मते घेऊन निवडून आला. रीगनला २७% वर समाधान मानावं लागलं. कॉनेली नि बेकरना पराभवाच्या दुःखापेक्षा बुशने रीगनचा पराभव केला याचाच जास्त आनंद. डिबेट संपल्यावर क्रेन नि अँडरसनला जास्त मार्क्स देणाऱ्यानीच बुशला उचलून धरले. आपल्या तिकडे नाही का वरवर जनताच्या बाजूने बोलणारे मत द्यायला गेले की काँग्रेसलाच देतात—तशापैकीच! ढोल तर चक्क झोपलाच!

डेमॉक्रॅटिक पक्षाच्या रिझल्टवरून कार्टरची लोकप्रियता चांगलीच वाढलेली दिसते. चक्क ५९% मते घेऊन आघाडी! केनेडीना ३१% मते घेऊन पुढची तयारी करावी लागणार आहे. ब्राऊन-इतकी ट्रॅजेडी तर कुणाची झाली नसेल. शून्य % मते त्यानेच घ्यावीत. कारण उरलेल्या १०% लोकानी आपली मते दिलीच नाहीत.

अशाच अजून ४-५ चाचण्या होतील. शेवटपर्यंत कोण टिकते ही उत्सुकता खरीच पण कार्टर बुश ही जोडी जर टिकली तर मात्र शेवटची लढाई अगदी तुल्यबळ होणार यात शका नाही!

या निमित्तानं थोडं बुशविषयी सांगायचा मोह आवरत नाही. हायस्कूल शिक्षण संपल्यावर दोन तीन वर्षे पायलट म्हणून २ ऱ्या महायुद्धात काम केलं. तेव्हा विमानाला गोळी लागून वीर समुद्रात पडले तर सबमरीनने सुटका केली. नंतर Yale university मधून इकॉनॉमिक्सची डिग्री घेतली आणि टेक्सासमध्ये पेट्रोलचा धंदा चांगलाच बसवला. ६९ साली प्रथम निवडून आलेल्या ह्या रिपब्लिकन उमेदवाराने गेल्या १० वर्षात राजकारणात चांगलीच achievement केली. १ ली सी. आय. ए. डिरेक्टर १ वर्ष चीनमध्ये अँबेसेडर वगैरे वगैरे जबाबदाऱ्या पार पाडून बुशसाहेबांनी स्वतःचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व गुलाबाप्रमाणे फुलवलं आहे. ५५ वर्षांचा हा उमेदवार 'जॉगिंग' करून तरुणालाही लाजवतो. काही म्हणा सध्या तरी ह्या 'जेमिनियन्'चे स्टार्स फार्मात आहेत.

पूर्वीपासूनच इथे एकाआड एक दोन्ही पक्षाचे अध्यक्ष निवडून येण्याची परंपरा आहे. त्यामुळे कुठलाही पक्ष आला सत्तेवर तरी राजकारण सांभाळण्यात दोन्ही तरबेज आहेत. एकाचीच मोनापली नाही—आपल्या तिकडच्यासारखी!

तसा पक्षांतर प्रकार इथेही पॉप्युलर आहे. पूर्वीचे डेमॉक्रॅटिक रीगनसाहेब आता रिपब्लिकन सभा गाजवत आहेत नि त्यांच्या सदोदित पाठीशी असणारे हॉलिवूड फेम डीनमार्टीन व फ्रॅंकसिनात्रा ह्याच्याही टोप्याचे रंग बदलले आहेत. तरी पण आपल्या तिकडचे 'नॅशनल पार्टी' काढणारे कलाकार जरा वेगळेच! बाई सत्तेवर आल्याने आता आपल्या तिकडेही बऱ्याच जणांचे जुने इंदिराप्रेम उफाळून येऊन पक्षातरे झाल्याच नवल नाही.

सत्तेचे खेळ सगळीकडे सारखेच! मतासाठी घरासमोरचे रस्ते दुरुस्त होतात. चहासाखरेचे भाव कमी झाल्यासारखे वाटतात. नुकतंच नाही. शिकॅगोकडचा मदतीचा प्रवाह न्यूयार्ककडे वळला! शिकॅगोच्या स्त्री-मेयरने कार्टरवर अविश्वास दाखवून केनेडीला पाठिंबा दिल्याचा हा परिणाम!

आयोवा कॉकेशसपासून नेत्याचे आवाज पंचमात चढले आहेत. डिसेंबरपर्यंत ते सप्तमात पोचले तर नवल नाही. काही काळ तरी होस्टेज प्रकरण किंचित् बाजूला पडलंय्. तरीसुद्धा रोज सर्व बातम्या देऊन झाल्यावर CBS वर वार्ताहराचा 'दादा' वॉल्टर क्रॉन्काइट रोज एकदा शेवटी हे वाक्य उच्चारतोच '85th day of captivity of Hostages in Iran.' असंच पुढं 86th, 90 th; 100th – हे कधी संपणार? काळाच्या ओघात त्यांचे नातेवाईक सुद्धा विसरतील. केवळ कमनशिबाने इथला एक तरुण व्यापारी इराणमध्ये अडकलाय्. त्याची तरुण सत्तावीस वर्षाची पत्नी नवऱ्या-विना किती काळ राहील हा परत प्रश्नच!

कालच कार्टरचे देशाला उद्देशून भाषण झालं. 'State of Union Is Strong And Sound' दरवर्षीप्रमाणे १ ले वाक्य यंदा कोणत्या जोरावर उच्चारणार? तीनच वर्षांपूर्वी संरक्षणावरचं बजेट कमी केलं होतं ते आता परत वाढवलंय. कपल्सरी भरती १८-२६ मधील तरुणाना सुरू होणार आहे—व्हिएटनामच्या वेळी परदेशात पळून गेलेल्याना कार्टरने माफ केले होते. न होगाऱ्या!

तिसऱ्या महायुद्धीच्या तयारीचे पडघम तरी वाजू लागलेत. होऊ नये व होणार नाही असं पाळण्यातल बाळही सांगेल.

### यदा यदाहि धर्मस्य

नवीन वर्षाच्या पिपाणीतून जगाच्या राजकारणाच तरी बदसूरच निघत आहेत. एका टोकास पोचलेल्या अत्याधुनिक समाजाची काय माँग आहे ती तरी पहा. आम्हाला आमच्या आजी आजोबाजवळ राहता येत नसेल तर ही 'आधुनिकता, तात्रिकता आम्हास नको' असं बाल अमेरिकन म्हणतात. अत्याधुनिकतेच्या टारगेटवर बॅप होऊन हा बॉल परत मागे जाऊ पाहातोय.

श्रद्धेसाठी काहीतरी चाचपडणारा हा समाज हळूहळू धर्माकडे वळू लागला आहे. पोप-जॉन-पॉल II ची लोकप्रियता हळूहळू वाढतच आहे. त्याची कार्यक्षमता स्तुत्य आहे. मुस्लिम देशानासुद्धा भेट देण्याचा पराक्रम अपूर्व आहे ह्याच्यात नक्कीच काही तरी असामान्य आहे. जगातल्या सर्वांत मोठा धर्म–ख्रिश्चनिटी–जन्माला आल्यापासून वाढतच आहे. त्याची धर्मप्रसाराची पद्धत मोठी सॉफिस्टिकेटेड! सेवेच्या नावाखाली धर्मप्रसार! उगीच नाही. स्वीडिश कॅथॉलिक ननमेर टेरेसाने–भारतातील गरिबीच्या जोरावर नोबेल प्राइज मिळवलेन.

जगातला २ रा डॉमिनेटिंग धर्म म्हणाल तर मुस्लिमच! काय योगायोग पाहा! ज्या 'ऑइल'मुळे जगाचे राजकारण नुसते ढवळून निघतेय त्याचे सर्व साठे ह्या धर्माच्या ताब्यात! बळजबरीने धर्मप्रसार व त्यासाठी लढाया करण्याची त्यांची परंपरा आयातोलाच कशी विसरेल?

त्याच्या खालोखाल बौद्ध धर्माचेंही वर्चस्व निर्विवाद आहे. जगातल्या सर्वांत मोठ्या लोकसंख्येच्या देशात नि आशियातील सर्वांत प्रगत देशात त्याचे बोधीवृक्ष फोफावलेले आहेतच.

मध्यंतरी अमेरिकेतल्याच एका प्रसिद्ध युनिव्हर्सिटीत विद्यार्थ्यांचे 'तुमची श्रद्धा कोणावर?' यावर मतदान झाले. त्याचा निकाल ऐकून मी तरी आश्चर्यात बुडून गेले येशू ख्रिस्ताच्या खालोखाल तरुणपिढीचा विश्वास, श्रद्धा महात्मा गांधीवर! हे ऐकून माझ्या देशबांधवाना जरूर धक्का बसेल, पण आता यावर विचार करायची वेळ आपली जवळ आली आहे.

जगातल्या सर्व धर्मांबरोबर गुण्यागोविंदाने आपला फार पुरातन धर्म नांदतो आहे. त्याने कधीही कुणावरही बळजबरी केली नाही की गोंडस नावे घेऊन धर्मप्रसारही केला नाही. 'हरे राम हरे कृष्ण' पंथी चकोट वीरांना इथे हसतातच, आपणही हसतो. परंतु विहिरीमध्ये ब्रेड टाकून अख्खे गावच्या गाव बाटवणाऱ्या पाद्र्यांना स्वर्गात येशूही हसला असेल. आपल्या देशातल्या तरुणाने भगवत्गीता किती वाचली असेल याविषयी शंका असेल, परंतु या चकोट वीरांनी ती जरूर वाचली आहे एवढेच नव्हे तर त्याचा खरा अर्थ अनुभवलाय. ह्याला, CBS च्या weekly magazine मध्ये – '60 minutes' ह्या कार्यक्रमामध्ये झालेली एका 'हरे राम हरे कृष्ण' पंथी तरुणाची मुलाखत, याहून वेगळा दाखला काय करायचा?

पूज्य भगवत्गीता, पुरातन हिंदु संस्कृती– बायबल, कुराणच्या वर्चस्वात हळूहळू लोप पावायची भीती वाटत असे ती व्यर्थ आहे. सर्व जगाला पुन्हा एकदा गीता ऐकवायची, अगतिक झालेल्यांना धीर देऊन आपल्या धर्मात आश्रय द्यायची वेळ जवळ आली आहे.

पाश्चात्याचे अनुकरण सर्वच बाबतीत कसं उपयोगी पडेल? आपला धर्म, संस्कृती, देश अट्टाहासानं जपायला हवा. माझ्या भाविक बांधवाना मी नेहमीच धीर देते की, बाबानो लोकं हसली तरी स्वधर्म, स्वसंस्कृती जुनीपुराणी म्हणून टाकू नका. ती जतन करा.

जगाच्या इतिहासाच्या रहाटगाडग्यामध्ये आधुनिकतेचं मडकं आता रिकामं होत आहे, पुढचं धर्माचं, संस्कृतीचं आहे ते ओतायला जवळ भरलेलं नको का? विश्वामध्ये बासरीचे सूर पुन्हा एकदा भरून जायची वेळ जवळ येत आहे.

नवीन वर्षाची, नवीन दशकाची, नव्या येणाऱ्या शतकाची माँग ओळखून आपल्या धर्माचं, संस्कृतीचं, देशाचं महत्त्व ओळखायला हवं. आपले कर्तव्य, आपल्या जबाबदाऱ्या ओळखायला हव्या, २१ वं शतक हे धर्म–संस्कृतीचं आहे. धर्माच्या अभ्यासकाने वर्तवलेलं भविष्य खरं व्हायची वेळ आली आहे.

MIT चे फिलॉसॉफीचे प्रोफेसर हुस्टन स्मिथ ह्यानी सर्व धर्मांवर लिहिलेल्या पुस्तकातील उताऱ्यावर मी तरी विश्वास ठेवून आहे. १९५२ साली एडिंबर्ग युनिव्हर्सिटीमध्ये अर्नाल्ड टॉयन्बी यानी काढलेले उद्गार पहा नि विचार करा-

In fifty years the world would be under the hegemony of the United States but that in the twentyfirst century, as religion captures the place of technology, it is possible that 'India the conquered will conquer its conquerors.' □


मान्यता पावलेला चरित्रग्रंथ

**टॉलस्टॉय – एक माणूस**

दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०

बदलत्या कथा (२)

# कोंबडा

वि. शं. पारगावकर

तिसऱ्या मजल्यावर दोन खोल्या आहेत. उत्तरेकडून त्याला दारं आहेत. अगोदर व्हरांडा. मग काही फुलझाडाच्या कुंड्या. एक खोली स्वैपाकाची. दुसरी उठण्याबसण्याची. प्रत्येक खोलीला दक्षिणेकडच्या बाजूला दोन दोन खिडक्या. एका खिडकीजवळ कोपऱ्यात एक पलंग. पलंगा शेजारची खिडकी नेहमी बंद असायची. तात्यांची उठण्याबसण्याची आणि रात्री झोपण्याची जागा म्हणजे तो पलंग. मुलं खाली झोपत असत. तात्यांची बायको देखील खालीच मुलांजवळ झोपत असे. तरीही तात्याना ती सतत आपल्याजवळ आहे असं वाटायचं.

कधी रात्रीच झोप उडाली आणि डोळे उघडले तरी खाली बायकोला ते जाणवायचं. तिचीही झोप खाडकन उडायची. मग ती हळूच विचारायची,

'जाग आली वाटतं !'

तात्या प्रथम काही बोलायचे नाहीत. फक्त कूस बदलायचे. पलंगाचा करऽ करऽ आवाज व्हायचा. रात्रीच्या शांततेत तो फार मोठा वाटायचा आणि तात्याना जाग आली असल्याची काकूंची नक्कीच खात्री व्हायची !

'का बोलत का नाही ?' ती हळूच विचारायची.

'तू केव्हा जागी झालीस ?' तात्या विचारायचे.

'ही, आत्ताच !'

'किती रात्र राहिली आता ?'

'कोण जाणे.'

'घड्याळाचे ठोके ऐकल्यावर कळेल !'

'कळेल तेव्हा कळेल. पण रात्र भरात आहे असं वाटतं !'

–आणि मग खूप बोलावंसं वाटायचं. दोघानाही. क्वचित जवळ येण्याचीही ओढ लागायची. मग किंचित काळ दोघानाही एकमेकांविषयी ओढ लागून राहायची. जागेवरच तळमळ व्हायची. कुशी बदलल्या जायच्या. क्वचित् काही बोलावंसंही वाटायचं. खूप खूप काही तरी. तसे ठरविलेले विषय काहीच नसायचे. पण तरीही बोलावंसं वाटायचं. मग तात्या विचारायचे.

'का ? काही बोलत का नाहीस ? का झोप लागली ?'

'छे हो, झोप कसली लागतेय आता !'

'का ग ?'

'तसं काहीच नाही. पण आता झोप लागत नाही. रात्रीच्या मध्यावर एकदा जाग आली की...'

'का ? विशेष काही ?'

'विशेष काहीच नाही ! तुम्हाला येते झोप ?'

''तुम्हाला येते झोप !' वा ?'

'का ? असं का बोललात ?'

'अग आता तुझ्यासारखंच माझं आहे.'

'ते कसं काय ?'

'म्हणजे तुझ्यासारखंच ! ते तुला माहीत आहे.'

'खरंच मला नाही माहीत काही !'

'अगं तुला ते माहीत आहे. तुला ते कळत नाही किंवा तुला ते सांगता येत नाही एवढच.'

'म्हणजे काय ?'

'म्हणजे ते रक्तात भिनलेलं असतं. मनात मिसळलेलं असतं. रोमरोमात असतं. पण शब्दात सापडत नाही.'

'मला झोप येत नाही एवढं खरं !'

'आणि मलाही येत नाही हेही तितकंच खरं.'

असं त्याच्यात बोलणं चाललेलं असतं. लग्न झालेल्या दोन मुली माहेरी आलेल्या असतात. त्या आणि त्यांची मुलं खाली काकूजवळच झोपलेली असतात. धाकटा एकुलता एक मुलगा वीस-एकवीस वर्षांचा असतो. त्याचं शिक्षण नुकतंच संपलेलं असतं आणि तो नोकरीच्या शोधात असतो. तो बाहेर व्हराड्यात झोपलेला असतो. त्याच्या गूढ चेहऱ्यावर गर्द झोप पसरलेली असते. झोपेत तो घामाघूम झालेला असतो.

मध्येच दोघांचं बोलणं ऐकून थोरली मुलगी किंचित् जागी होते. जागी नाहीच, फक्त तिची झोप चाळवलेली असते. ती झोपेतच विचारते.

'का गं आई ! जागी झालीस वाटत ?'

'उगीच गं, थोडी जाग आली. तू झोप आपली.'

मग ती मुलगी उशाजवळच्या तांब्यातून पाणी ओतून घेते आणि झोपेतच जवळच्या मुलाला पाजते आणि दुसऱ्या क्षणाला डोक्यावरून पांघरून घेऊन झोपी जाते, चक्क घोरू लागते.

तात्यांच्या डोक्यात विचार चाललेले असतात. हल्ली डोक्यात विचारच फार फार येतात. पूर्वी कधी आले नव्हते इतके येतात. पूर्वी आयुष्यात ज्या गोष्टींचा विचार केला नव्हता त्या विचारांची वेटोळी मनाभोवती पडलेली असतात. मग धास्तावून ते विचारतात,

'तुझं आताशी नेहमी नेहमी आजारी पडणं चांगलं नाही.'

मध्यंतरीच्या काळात काकू जरा गुंगीत असतात आणि त्यांच्या डोक्यात विचारही नसतात म्हणून ठक्क जागेपण त्यांच्याजवळ नसतं. पण नवऱ्याचा आवाज ऐकून त्यांची गुंगी ढळते.

'काय म्हणालात तुम्ही ?' त्या विचारतात.

'तुझं आताशी नेहमी नेहमी आजारी पडणं चांगलं नाही.' म्हणालो.

'ऊऽऽऽ!' म्हणून काकू एक नि:श्वास सोडतात.

'असं दुर्लक्ष करून चालणार नाही ! मला तू हवी आहेस.'

'अहो आजाराच्या गोष्टी कोणाच्या हातात का असतात ?'

'असतात तर ? मनाची उभारी बाधायला हवी.'

'माझं मन तर नेहमीच तरतरीत असतं.'

'कसलं आलाय ? अलीकडे तुझं कशातच धड लक्ष नसतं.

माझ्याकडेही नसतं. आता हेच पहा ना. मला तू जवळ असावीशी वाटतेस. पण ते काही तुझ्या लक्षात येत नाही !'

त्यावर काकू हसल्यासारखा भास होतो. त्यांचा चेहराही उजळतो, तकतकीत होतो. मग त्या कूस बदलतात. खालूनच नवऱ्याच्या थोडंसं जवळ सरकल्याचा आभास निर्माण करतात. पण तेवढ्यातही त्या विलक्षण लाजतात. मन दोन्ही ओठ मिटून त्यावर एक बोट उभं ठेवतात आणि म्हणतात.

'शूऽऽ कुणी जागं असेल, ऐकेल तर बरं का ते ?'

'एवढ्या मध्यरात्रीला आपल्या दोघांशिवाय तिसरं कोण वेडं जागं असणार ?'

तेवढ्यात थोरलीची धाकटी मुलगी झोपेतच रडू लागते. तिची आई झोपेतच तिला ओढून घेते आणि तिची पाठ चोळू लागते. मुलगी चटकन रडायची थांबते. जणू काही झोपेतच तिला आपल्या आईच्या स्पर्शाची ओढ लागलेली असावी म्हणून तिचं रडणं आणि स्पर्श झाल्याबरोबर पुन्हा झोपेत विलीन होणं.

तात्यांना आणि काकूंना दोघांनाही ते कळतं. जणू अंधारात ते चित्र स्पष्टपणे त्यांच्या डोळ्यापुढे उभं राहतं. त्यांना काही पूर्वीच्या आठवणी एकदमच होतात. आणि त्यांचं एकदमच हसू येतं, अंधारात दोघांनाही एकमेकांचं हसू समजतं. आणि पुन्हा त्याचंही हसू येतं. मग तात्या विचारतात,

'का हसलीस ?'

'ते तुम्हालाही माहीत आहे !'

हे म्हणत असताना काकूंचे शब्द हसरे होतात. त्यांना थोडी थट्टेची किनार लाभते. तात्यांना ते समजलेलं असतं. विशेषतः थोड्या वेळापूर्वी 'म्हणजे तुझ्यासारखचं ! ते तुलाही माहीत आहे.' हे तात्या काकूंना म्हणालेले असतात, त्याची त्यांना आठवण होते. आणि आपली बाजू आपल्यावरच उलटल्याचं लक्षात येतं. बायकोच्या बोलण्यातल्या शहाणपणाचं त्यांना कौतुक वाटतं. आणि तिच्याकडून झालेल्या थट्टेमुळे त्यांचं सर्वांग शहारतं. मन आणखी प्रसन्न आणि टवटवीत होतं. मग ते तिला विचारतात,

'तू माझी थट्टा करतेस काय ?'

वास्तविक तिची थट्टा त्यांना आवडलेली असते. इतकंच नव्हे तर आणखी तिची थट्टा करावी, उलट थोडा वेळ का होईना आपल्या जवळ येऊन झोपावं. आपल्या गळ्यात हात टाकून आपल्याला घट्ट घट्ट, कधीही न संपणारी साथ द्यावी असं वाटत असतं.

'खरंच नाही हो ! मी कशाला तुमची थट्टा करू ?'

'चक्क केलीस थट्टा तू आत्ता !'

'अहो, मला थट्टा तरी करता येते का ? आयुष्यभर मी आपली वेडी गबाडीच राहिले. तुम्ही होता म्हणून मला सांभाळून घेतलंत. नाही तर माझं कुठं हो निभलं असतं दुसरीकडे ?'

तिच्या निरागसतेचं तात्यांना कौतुक वाटतं. आणि तिनं केलेल्या गौरवाबद्दल स्वतःचा अभिमानही वाटतो. पण तिचं बोलणं त्यांना खरं वाटत नाही. आपण तिला सांभाळून घेतलं म्हणजे काय केलं ? तसं काहीच केलं नाही आपण ! उलट तिनंच आपल्याला सांभाळून घेतलं. आपलं आयुष्य म्हणजे वाऱ्यावरचा दिवा होता. आपल्याला कोणाचा पाठिंबा नव्हता. कोणाचा दिलासा नव्हता, कोणाचा आधार


**अजून वेळ गेली नाही...**

**५० व्या वर्षी बचतीला सुरुवात करुनसुद्धां सांगली बँक तुम्हाला हयातभर दरमहा पेन्शन देते.**

बचत करणे ही आज अेक जीवनावश्यक बाब होऊन बसली आहे. मग तिची सुरुवात तुम्ही तरुणपणात करा किंवा म्हातारपणी. हो! हो! म्हातारपणी सुद्धां.... त्यात आश्चर्य वाटण्यासारखे कांही नाही. सांगली बँकेच्या **'चिरंतन उत्पन्न ठेव'** योजनेत वयाच्या ५० व्या वर्षीसुद्धां दरमहा ठराविक बचत करुन तुम्हाला मुदतीनंतर दरमहा तहहयात वाढीव पेन्शन किंवा पाहिजे असल्यास एकमुठी रक्कम मिळू शकते.


'चिरंतन उत्पन्न ठेव' योजनेच्या माहितीसाठी आमच्या कोणत्याही शाखेस भेट द्या.

आपल्या उत्कर्षातील साथीदार

**दि सांगली बँक लि.**

रजि. ऑफिस- राजवाडा चौक, सांगली

चेअरमन : एम. आर. रणदिवे



नव्हता. तारुण्याचा हूडपणा, बेफिकीर वृत्ती आणि कधीच जमिनीवर किरणं न टाकणारी अफाट स्वप्नं. कशातच काही दम नव्हता. क्षणाक्षणाला वाहवत जाण्याची भीती. तुटपुंजी नोकरी. हालाखीचे दिवस. पण त्या साऱ्यांमधून हिनं किती कौशल्यानं, किती हिमतीनं ओढून काढलं आपल्याला बाहेर!

तात्यांना तारुण्यातले ते दिवस आठवतात. बायकोचं तारुण्यही आठवलं. ती फार सुंदर कधीच नव्हती, पण तारुण्यामुळे आणि अनेक शांत–समंजस वृत्तीमुळे ती सुदर दिसत होती.

तात्याना विचारांनी घेरलेलं असतं. तेवढ्यात काकू विचारतात,

'रागावलात का माझ्यावर?'

तिचं बोलणं ऐकून तात्या भानावर येतात. आणि पूर्वीच्या दिवसांच्या आठवणीचं ओझं एकदम गळून पडतं! ते म्हणतात,

'होय, मी रागावलोय तुझ्यावर!'

'मला माहीत आहे तुमचा राग. त्याची नाही मला भीती वाटत!'

'ते कसं काय?'

'अहो, एखादा साप रोज रोज घरात निघू लागला तर त्याची तरी कुठं भीती वाटते?'

'हीच किंमत केलीस वाटतं माझी?'

'कशी करेन. मी तुमचा राग घालवणार आहे ना?'

'तुला काय माहीत मला राग कशाचा आलाय ते?'

'मला सारं माहीत आहे!' म्हणून काकू खुदकन हसतात. त्यांच्या हसण्याचे शहारे तात्यांच्या शरीरावर उमटतात. आणि त्यांच्याही चेहऱ्यावर हसू पसरतं. आणि ते विचारतात,

'आता रात्र किती राहिली असेल गं?'

'बरीच असेल असं वाटतं?'

काकूंच्या चेहऱ्यावरचं हसू अजून विरलेलं नसतं. तेवढ्यात व्हरांड्यातला मुलगा जागा झाल्याची चाहूल लागते. तो अंथरुणातच उठून बसलेला असतो. तात्या आणि काकू क्षणभर जीव धरून गप्प बसतात. मुलगा उठतो आणि व्हरांड्यातल्या रेलिंगला टेकून उभा राहतो. अंधारातच आभाळाकडे पाहत असतो. खालून डांबरी सडक गेलेली असते. सडकेच्या दुसऱ्या कडेला सरकारी दवाखाना असतो. दवाखान्याबाहेरच्या कमानीवर मोठा लाल दिवा चमकत असतो. त्या उजेडात आजूबाजूचं सारं वातावरण गंभीर दिसतं.

मुलाच्या मनात काय चाललेलं असतं कोणास ठाऊक! नोकरी-संबंधीचे विचार घोळत असतील? का लग्नाविषयीचे. त्याच्या गोऱ्या ओठावर आता काळ्या झुपकेदार मिशा बिलगलेल्या असतात. कानापासले कट बरेच खाली उतरलेले असतात. तो अस्वस्थ दिसतो. तात्यांना आणि काकूंना ते कळतं. दोघांच्याही मनात त्याच वेळी काही तरी बोलावं असं येतं आणि दोघांच्याही मनातून तो विचार एकदमच नाहीसा होतो.

तात्याना आठवतं आपणही तरुणपणी याच्यासारखेच अपरात्री उठत असू. अशीच आकाशाला दृष्टी भिडवून तासन् तास नजर खिळवून बसत असू. आणि?

तात्यांच्या मनात आणखी एक विचार येतो आणि त्याचं त्यांनाच हसू येतं! काकूंना नेहमीप्रमाणे ते समजतं आणि अंधारात दिसतं. एरवी त्यानी त्याबद्दल तात्याना विचारलं असतं. पण आता बाहेर मुलगा उभा असतो. आता काही बोलणं योग्य नसतं.

तात्यांच्या मनात आलेला विचारही काकूंना कळतो. कारण तात्यांनी काकूंना त्याबद्दल अनेक वेळा सांगितलेलं असतं– ते म्हणजे रात्री उठून तात्या साऱ्या मोठ्या माणसांना चोरून विड्या ओढीत असत!

मुलगा तशी सिगरेट वगैरे काही ओढीत नसतो. तात्यांना त्याच्या निर्व्यसनीपणाचं कौतुक वाटतं आणि कृतार्थही वाटतं. परंतु त्याच वेळी त्याना स्वतःच्या तारुण्यातल्या खट्याळपणाचं आणि बेरकेपणाचं कौतुकही वाटतं!

मुलाचं आता अंधारात आकाशात पाहून झालेलं असतं. त्याची पावलं स्वैपाकघरात वाजतात. स्वैपाकघरातला दिवा लावल्याचा खटका वाजतो. मुलगा पाणी पितो. पुन्हा दिवा काढून टाकतो. स्वैपाकघराचं दार बंद करतो आणि व्हरांड्यात येऊन झोपतो. थोड्याच वेळात एकदम शांतता पसरते. तात्यांच्या मनाला पुन्हा जाग येते. काकूंना समजतं की, मुलगा झोपी गेला.

काकू हळूच विचारतात,

'तुम्ही मघाशी मला काही विचारीत होता ना?'

'मी विचारलं त्याचं तू उत्तर दिलं होतंस!'

'कशाबद्दल?'

'हेच रात्र किती झाली म्हणून विचारलं होतं मी.'

'असं होय!'

'का? माझी पुन्हा थट्टा करतेस वाटतं?'

'नाही बाई. मी तुमची आयुष्यात कधीच थट्टा केली नाही!'

'मग आता काय करीत आहेस?'

'पाहा बाई!'

'मघापासून मी तुला जवळ बोलावतोय आणि तू हुलकावण्या देते आहेस!'

'अहो, पण तुम्ही पाहिलंत ना मघापासून? कोण कोण उठलं? कोण कोण जागं झालं? आता आपण असं एकत्र येणं बरं आहे का?'

'नसायला काय झालं?'

'आता आपल्या दोघांचंच असं काय राहिलंय संसारात?'

'असं का म्हणतेस? आपण दोघं आहोत म्हणूनच सारं काही आहे.'

'तो तुमचा भ्रम आहे!'

'कसा काय?'

'आपण दोघं होतो म्हणून संसार झाला असं म्हणा फार तर?'

'आणि आता?'

'आता काही नाही. बैल आपल्या गोठ्यात येऊन विसावले आहेत. थकले आहेत. आता त्यांचं वय झालेलं आहे!'

'तू तर बृहस्पतीसारखं बोलायला लागलीस?'

त्यावर काकू गप्प बसतात. मागचा सारा चित्रपट त्यांच्या डोळ्यासमोरून सरकत असतो. नवऱ्याने आपल्यावर किती प्रेम केलेलं असतं. आपण अशा वेड्या-बागड्या. धड स्वरूप नाही, धड गुण नाहीत. कशाच्या जिवावर ह्यानी आपल्याला जवळ केलं. आपल्या-

वरून सारं आयुष्य ओवाळून टाकलं ? आपल्याला मुलं झाली तीही सुंदर, सद्गुणी. एक भाबडेपणा सोडला तर आपल्याजवळ काय होतं; काय आहे ?

मुलं हीसुद्धा त्यांचीच ठेव. त्यांचीच प्रतिकृती. त्यांचाच स्वभाव–गुणधर्म. आपलं काय आहे त्यांच्यात ? थोरली मीरा. गोरी गोरी पान. निमुळत्या सरळ नाकाची. घाऱ्या टपोऱ्या डोळ्यांची. मधली वीणा. थोडी सावळी. पण विलक्षण तरतरीत, हुशार, व्यवहारी, खूप शिकलेली. तिची मुलं तरी किती वेगळी ? चुणचुणीत. गुणी आणि धाकटा मुलगा. तो तर थेट ह्यांच्यावरच गेलेला. थोडीशी वाकडी मान करून तो रस्त्यानं चालू लागला की त्याची पाठमोरी आकृती थेट ह्यांच्यासारखीच दिसते. तरुणपणातली. त्याचा राग आणि त्याचं बोलणं ह्यांच्याच वळणावरचं !

असं हे सारं त्यांचंच. मग आपलं काय या संसारात ? आपण कुठे बसतो ? आपण नवऱ्याचा संसार केला, म्हणजे काय केलं. त्यानेच आपला संसार केला आणि स्वतःचा करून घेतला. आपण कष्ट केले. मुलांना वाढविलं. नवऱ्याला जास्तीत जास्त सुख देण्याचा प्रयत्न केला. सर्व अंगानी. आपल्याला जेवढं शक्य होतं तेवढं, आपल्या जेवढं हातात होतं तेवढं !

आता तेही शक्य नाही. तेवढं बळ राहिलं नाही. वय सरकलं तरीही सुख देण्यात आपण कसूर करीत नाही. ह्यांच्यासाठी जीव तळमळतो; टांगणी लागतो. तसाच मुलासाठीही. आता मुलीचाही ओझं राहिलेलं नाही. आणि मुलगा तर पहिल्यापासूनच स्वतंत्र वृत्तीचा. अलिप्त, कोरडा. त्याला कोणाची मदत नको, कोणाचा हात नको, कोणाचा आसरा नको. त्याचं थेट ह्यांच्यासारखंच. माया करील, माया लावील पण माया लावून घेणार नाही ! हवं तर सगळं असतं; पण मागून घेणार नाही. असं वागेल की आपण ते करावं, सहज आपणहून करावं !

काकूंच्या मनात विचारांची गर्दी झालेली असते. यापूर्वी त्यांना एवढ्या आवेगाने विचारांनी कधीच झपाटलं नसतं !

'आता मात्र तुला झोप लागलेली दिसते बरं का? तात्या विचारतात. त्यांचाही स्वर हळवा झालेला आहे. त्यांच्याही मनात जणू भावनांची गर्दी झाली आहे. त्यानाही विलक्षण एकटं वाटत असावं.

भानावर आल्यासारख्या काकू दचकतात. मग अंधारात डोळे मोठे करून चहूकडे बघतात; पण अंधाराशिवाय त्यांना काहीच दिसत नाही. अंथरुणावरच चुळबूळ करतात. कूस बदलतात आणि नवऱ्याला उत्तर देतात.

'झोप येतच नाही !'

'पण आवाज जड झालाय.'

'ऊं ऽऽ !'

'का ?'

तेवढ्यात धाकट्या मुलीची धाकटी मुलगी झोपेतच आजी ऽऽ आजी ऽऽ' म्हणून हाका मारू लागते ! संथ पाण्याच्या पृष्ठभागावर खडा पडून पाण्याचा संथपणा ढवळावा तसे होते. काकू हळूहळू सरकत नातीच्या अंथरुणाजवळ जातात आणि तिच्या पाठीवर थोपटू लागतात. आजीच्या हाताचा स्पर्श झाल्याचे नातीला जाणवले आणि ऊ ऽऽ ऊ ऽऽ करीत करीत ती झोपी जाते. पुन्हा संपूर्ण शांतता पसरते.

काकूंचा हात अजून नातीच्या पाठीवर फिरतच असतो. आता त्यांना संसाराची उब एकाएकी जाणवू लागते. जीवनाचं सार्थक वाटू लागतं. आपण गरजेची वस्तू आहोत; आपल्यालाही व्यक्तित्व आहे, आपणही बऱ्याच जणाचे-आहोत याचा उमज त्यांना पडतो. त्यांच्या मनात एकदम तात्यांचे चित्र उभे राहते. आजी या हाकेत जशी पूर्तता आहे तशी तात्यांच्या हाकेतही आहे हे एका उमाळ्यासरशी काकूंना जाणवतं.

आणि एकदम त्यांना तात्यांच्या दृढ सहवासाची ओढ लागते. त्यांचा हात अजूनही नातीच्या पाठीवरून हळूहळू फिरतच असतो. तो त्या अलगद काढून घेतात. आणि त्या अंथरुणावर उठून बसतात. ते तात्याना जाणवतं आणि त्यांचं काळीज अधीर होऊन उठलं. ते अगदी हलकेच कापऱ्या आवाजात हाक मारतात,

'सरस्वती !'

'ऊंऽऽऽ—'

'काय करतेस ?'

काकू दातात ओठ दाबून धरतात त्यातून पिवळं केशरी हसू पिळून काढतात आणि त्या अगदी हलके हलके तात्यांच्या पलंगाकडे जाऊ लागतात. त्या पलंगाजवळ पोहोचतात तेवढ्यात दूरवरून एक कोंबडा आरवतो. दुसऱ्या क्षणाला आणखी एक कोंबडा आरवतो. आणि काकूंची पावलं तिथल्या तिथंच थबकतात. आणि तिथून मागे फिरत त्या म्हणतात,

'पहाट झाली !'

आणि त्या स्वैपाकघराकडे वळतात !

□


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी

(प्रास्ताविकातून)

**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# पुस्तके

रेखा इनामदार

# नागफणा आणि सूर्य

## कणखर कारुण्याचा जळजळीत आविष्कार !

कुठल्याशा गर्द गुहेतून निघालेल्या, घन व्याकुळ ओल्या पाऊलवाटेनं या कवीच्या सावधपणाला सहज चकवलेलं आहे, यशस्वी जगण्याच्या सर्व सवयी आत्मसात करता करता मनावर लिंपलेले सर्व पोपडे उचकटून काढले आहेत आणि त्याच्या वोथट, शिळ्या, शब्दांना अशुद्ध रक्त आणि अनौरस अश्रूंत अक्षरशः बुचकळून काढले आहे. ही पाऊलवाट फक्त किंचितच ओली आहे, ती उजळलेली नाही. त्यामुळे मध्यान्हाच्या तळपणाऱ्या उन्हाचाच ज्यांच्या डोळ्यांना आजतागायत सराव झाला आहे त्यांना या मिणमिणत्या वाटेवरून प्रवास करणे अजिबात गैरसोयीचे आहे. कारण गर्द गुहा ही काळोखी आहे, वाटेवर खाचखळगे जास्त दिसताहेत आणि पुढचे विश्रान्तिस्थानही विकल नजरेच्या सहजासहजी आवाक्यात येणारे नाही. तेव्हा आपल्या प्रत्येक पावलाला लागणारी ठेच सहन करण्याची ताकद असल्याशिवाय इकडे वळूच नये हे बरे ! अर्थात तरीही आपली कमावलेली कातडी सर्पदंशापासून वाचेलच अशी हमी देता येणे कठीण आहे. कारण आपण आपल्याला आणि इतरांना अनेक गोष्टींपासून वंचित केलेले असले तरी बहुसंख्य इतरांना मंजूर नाही. या तीव्र नामंजुरीतूनच कोंडलेल्या उदास रक्ताचा पाट समजूतदार त्वचेची सर्व आवरणे झुगारून बाहेर पडलेला आहे. आणि त्यापासून कोणीही अस्पर्श राहणार नाही अशीच या प्रदीर्घ कवितेची प्रतिज्ञा आहे.

कारण ही जन्मली : हिला जन्म
हवा होता म्हणून.
ही गूढ आतली, कोरत होती दडून
ही मोही
नव्हती रहात माझ्यापुरती, माझ्याजवळ
ही होती– (पृ. चार)

अशा अपरिहार्यतेतून तिचा कोंभ तरारलेला आहे, ती अपरिहार्य जरूर आहे. पण केवळ अगतिक, असहाय्य मात्र नाही. गजमल माळीच्या या दीर्घ कवितेचे हे मोठे सामर्थ्य आहे. कारण ' हाडाच्या सापळ्यातून वाहणाऱ्या काळाभोर रक्ता 'लाही निळाशार स्मृतीची, हिरव्याकंच रानाची वा चुडाची, निर्भर पाखरांची, कोवळ्याकोमल चन्द्र किरणांची, तळपत्या सूर्य प्रकाशाची किंवा वस्त्यातल्या फाटक्या जुनेर-ठिगळांची, बुजबुजलेल्या, सडलेल्या दारिद्र्याची ओतप्रोत चटक लागते आणि मग सरावलेल्या निर्जीव हातांनीच जीर्णशीर्ण ढोल बडवले जातात तेव्हाची व्यथाही फार क्षीण झालेली असते. या कवितेचं कूळ फार श्रीमंत आहे. कारणं इथल्या दुःखाचे केवळ कवडसे नाहीत तर भक्कम पाठबळ घेऊन वारसाहक्क तितक्याच जोरदारपणानं सांगणारं, परंपरागत, पिढीजात चालत आलेलं हे दुःख कवीच्या अंगालाच जाऊन भिडलेलं आहे–त्याचं वेगळं अस्तित्वच उरलेलं नाही. मग कधी ते 'ओव्यात झिंगलेल्या ' हे विशेषण त्याच्या सर्व अर्थछटांसह लक्षात घेण्यासारखे आहे. अखंड राबणाऱ्या आणि अखेर मेलेल्या मातीच्या ढेकळातच कोसळून जीव टाकणाऱ्या बापाच्या आणि त्याची संगतसोबत निभावून नेता नेता फाटक्या गळक्या ओटीत चंद्रबिंब झुलवणाऱ्या, खुळ्या आशेवर तडफडणाऱ्या आईच्या संदर्भातून व्यक्त होतं, तर कधी त्याचा संदर्भ ' दुःखाच्या डोहाला लागलेले मरणाचे डोहाळे ' न्याहाळण्याइतका व्यापक होतो आणि मग

' फिरतो या प्रदेशातून
पेटलेल्या सर्वस्वाही वणव्यातून...
पहातो उघड्या डोळ्यातही
न मावणारे आकाश
वितळून गळालेले, झिरपते दुःख...
यावा एकच एक थरथरता काळोख
हुंकारीत ओला वेदनेचा,
यावा एकच एक कापरा सूर सर्वत्र
फुटलेल्या असहाय्य खोल,
दीर्घ किंकाळयांचा' (पृ. ६६)

अशा दुभंगून टाकणाऱ्या स्वरांना चुकवता येणे मुष्किल होते. म्हणून इथे विभागला गेलेला संदर्भ, तपशीलही मला फार बिनमहत्त्वाचा वाटतो–कारण संदर्भ सनातन असला तरी तो इथे विलक्षण सजीव चैतन्यदायी होऊन आलेला आहे– मग पार्श्वभूमी कौटुंबिक असो किंवा सामूहिक, सामाजिक, असो. म्हणून काही ठिकाणी या कवितेची वीण विसकटलेली, विस्कळित असली तरी तिच्या सामर्थ्याला फार ढळ पोचत नाही कारण ही भावना गोंजारून, बांधेसूद करून 'सप्रेम भेट ' देणे या कवीला अशक्य आहे. तळाशी साचलेली घाण उपसून काढण्यासाठी एकतर पाणी स्वच्छ, संथ प्रवाहाने वहाते असावे लागते, वा नजर तीक्ष्ण आणि सोशिक असावी लागते. तेवढी सोशिकता या कवी जवळ आहे. पण ती ( नेहमीसारखी ) मूक नाही तर खड्या आवाजाने सवाल करणारी आहे.

'इतिहास या देशाचा पाहिलाय का कधी
तुम्ही विवेकी मनान तपासून ?
घटनांचे संदर्भ ?
व्यक्तींची चपळ नाती गुंतलेली ?
त्यातील खरं सामर्थ्य राहिले उभे
कोणाच्या मनगटातून ?
आहेत कोवळे रंग ओले गच्चगार
अजिठ्याच्या लेण्याचे,
आहेत ना मागे उभे
सृजनशील हात श्रमिकाचे ?'

(पृ. ३८, ३९)

–अशा प्रस्थापितांच्या सोयीस्कर स्मरणाच्या नोंदीमधील शहाजोगपणाला उघडे पाडणारे हे प्रश्न आहेत पण

'भूतकाळाचा एवढाच आधार
हवा असतो काय मानवाला
भविष्याची अहंकारी स्वप्ने पाहण्यासाठी?'

–असा जाब विचारण्यापर्यंतच कवीचा त्वेष नाही तर तो पुढे या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या वाटेवरून शोधण्याचा प्रयत्न करतो आणि त्यासाठी आवश्यक असणारा स्वतःचाही शोध घेतो, मग सामाजिक अस्मिताही अनेक प्रश्नचिन्हे उभी करते–

'जुंपलेल्या सात घोड्यांच्या रथातून
अस्मिता निघते मणिपोवळ्याच्या
वृक्षराजीतून
दुतर्फा उभे असतात तिची स्तोत्र गाणारे
नवे भाट.
रथाच्या मग्रूर वाटा जातात दुर्बलाच्या
कुल्यावरून–' (पृ. ३४)

खोलवर रुजून पक्की झालेली मूळे उखडून टाकणारे हे प्रश्न आणि त्याची त्या त्या मर्यादित / व्यापक संदर्भात शोधलेली तात्पुरती / शाश्वत उत्तरे अक्षरशः कासावीस करणारी आहेत. मस्तवाल–मग्रूर सरंजामदारी मनोवृत्ती तिनं उरीपोटी कवटाळून उत्तेजन दिलेल्या वाझ रूढी; परंपरा, आणि तिनंच दास्यत्वात खितपत ठेवलेला विकल पोखरलेला धर्म पुन्हा पारखून घेण्याची आवश्यकता पुनः पुन्हा इथे व्यक्त होते म्हणून केवळ 'नागफणा' नाही तर त्याच्या जोडीला 'सूर्य' ही आहे. 'सूर्य' नसता तर अखेर 'महामानवाने लावलेला दिवा' ही दिसला नसता कदाचित ! आणि त्याच्या पुरेशा प्रकाशात होणारे, केले जाणार अत्याचारही नजर भेदून गेले नसते.)

अगदी प्रारंभीच्या निवेदन, प्रस्तावनेपासून आतील अर्थपूर्ण रेखाटनासह ही कविता वाचकाला त्याची विचार करण्याची चाकोरीदेखील तपासून घेण्याची गरज निर्माण करते. या प्रदीर्घ कवितेला प्रा. जनार्दन वाघमारे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेचाही उल्लेख आवर्जून केला पाहिजे. प्रथम आख्यान काव्ये व नंतर खंडकाव्ये अशा दोन वाटानी विकसित झालेली मराठी दीर्घकवितेची परंपरा, त्यांचे स्वरूप–वैशिष्टये, या कवितेत अटळ असणारा रासायनिक संदर्भ, तिची वैश्विकता, प्रतिमा–प्रतिकाचे स्पष्टीकरण आणि अखेर तिच्या श्रेष्ठत्वाच्या निकषावर न जोखलेली कमी जास्त – काव्यात्मकता या सर्वांचा ऊहापोह प्रस्तावनेत व्यवस्थित पणाने आलेला आहे. (पण विशेषतः अशा तऱ्हेच्या पुस्तकावर लिहिताना परकी अवतरणांनी मुद्दे सिद्ध करणे फारच विसंगत वाटते !)

या सर्वांतून आपल्या अस्मितेचे थोडेबहुत भान जरी आले तरी (तरच !) या कवितेचे आपल्याशी असलेले नाते थोडेसे का होईना पण जुळले असे म्हणता येईल. आणि अर्थातच आपल्या बुळबुळीत मनाला शब्द लावून घेण्याची सवय किती आहे, त्यावरच असे सख्य अवलंबून असणार हे उघड आहे.

*

**नागफणा आणि सूर्य (दीर्घ कविता)**
गजमल माळी
पृथक प्रकाशन, औरंगाबाद
पृष्ठे–९३. मूल्य–३० रुपये.

फिनिक्स निवड

# Lhasa The Open City

( A Journey to Tibet )
( Han Suyin
( Triad Panther, pages 192 ).

बेंटमचा कोंबडा, सीग्नेटचा वर्तुळामधला उभट एस्, पॅन बुक्सचा बासरी वाजवणारा कुमार, कॉरॉनेटचा चौकोनामधला ठळक सी, फौंटाना कॉलीन्सचे कारंजे, अॅव्हॉन बुक्सचा वर्तुळामधील A, फॉसेट क्रेस्टचा एक रेषा नसलेला समकोन किंवा आयत, स्फीअर्स बुक्सचा पृथ्वीचा गोळा, पेलिकन व पेंग्विन पॉकेट बुक्सचा कागारू या चित्रावरून आम्ही कधीकधी पुस्तके शोधून काढीत असतो. काहीकाही वाचक तर आम्हाला कॉर्गीचीच पुस्तके हवी, पेलिकनची किंवा पेंग्विनचीच हवी असे सांगतात. हे असे होते तेव्हा ग्रंथपाल थोडा amuse होतो. कारण कोंबड्याच्या पोटातून कधी एखादे चांगले पुस्तक प्रसवेल किंवा कागारूची वळसा घातलेली शेपटी कधी एखाद्या उत्कृष्ट पुस्तकावर दिसेल किंवा कारंज्यातून एखादे ओरिजिनल पुस्तक कधी उडेल ते सांगणे कठीणच.

आपल्याकडे पण 'मौजे'चा दबदबा बघून मौज वाटते. 'अहो मौजेचं पुस्तक आहे. चांगलंच असणार !' असे खटाववाडीविषयी मी कितीतरी वेळा ऐकले आहे.

हे सर्व लिहिण्याचे कारण असे की, एकदा पँथर पुस्तकाविषयी आमच्या ग्रंथालयात थोडीशी धमाल उडाली. मी अमकं एक पुस्तक शोधत होतो व ते पँथरचेच होते याची मला खात्री वाटत होती आणि मी चित्त्याच्या ट्रेडमार्कच्या शोधात होतो, पुस्तकाच्या नावावरून शोधण्यापेक्षा ते पुस्तक रंग, रूप, आकार व ट्रेडमार्कवरून शोधण्याची मजा काही औरच असते. या अशा पद्धतीने पुस्तक लवकर सापडते याच्यावर कुणाचा विश्वास बसणार नाही. पण आमच्याकडील

कमी इंग्रजी शिकलेले कर्मचारी अशा पद्धतीने इतके लवकर पुस्तक शोधून काढतात की, आपल्याला अचंबा वाटावा. मी पण ही पद्धत हळूहळू त्यांच्यापासून शिकत आहे. नवीन इंग्रजी पुस्तके आली की, आम्ही रस्त्याच्या बाजूला वाचकाना सहजरीत्या दिसावी अशी लावतो आणि नावावरून अमके पुस्तक द्या त्याच्यापेक्षा 'अहो बाहेरील लाल कलरचे पांढऱ्या अक्षराचे पुस्तक काढून द्या' असे म्हटले की लवकर सापडते !

मला शेवटी चित्ता सापडेचना तेव्हा मग क्रमांकावरून ते शोधलं. ते पुस्तकही सदरच्या पुस्तकाप्रमाणे ट्राएड पँथरचे होते. म्हणून हे सर्व आठवते त्याचे नाव होते Manwatching. डेसमंड मॉरिसचे आहे ते पुस्तक. (नेकेड एपवाला). पण काय आश्चर्य ! पँथरचे पुस्तक असूनही त्याच्यावर चित्त्याचा ट्रेडमार्क नव्हता ! मला KLG किंवा MICO प्लगची जाहिरात बघून चित्ता आठवला की काय ? की मनात एखादा दलित पँथर घुटमळत होता ? पण सर्व बेटचा प्रकाशकाचे ट्रेडमार्क आहेत आणि पँथरचाच नाही याला मी काय करणार ? फक्त अंडाकृती लंबवर्तुळात Panther असे लिहिलेले असते. मग निदान Egg Books किंवा Oval Books असे तरी नाव द्यायचे. ग्रंथालय चालवताना मला असे आढळून आले की, काही न सापडणारी पुस्तके शोधताना आपण अनेकातली एक चूक करून बसतो ती अशी की, आपण आधीच एक चुकीची समजूत करून बसतो की, अमक्या पुस्तकाचे बाईंडिंग, रंग, रूप हे असेच आहे मग खरोखर हवं असलेलं पुस्तक रंगेत असताना कधीकधी आपल्याला ते सापडत नाही. कारण आपण बघत असतो वेगळंच रूप आणि वेगळाच रंग आणि जेव्हा हवे असलेले पुस्तक सापडते तेव्हा 'अरेच्या, याचा रंग निळा नसून लाल आहे ! पुढच्या वेळेला आता हे पुस्तक आपल्याला हुलकावणी देणार नाही.' आणि होतही तसंच. ते न सापडलेलं पुस्तक आपल्या स्मृतीत कायमचं घर करून बसतं. पुस्तके रंग, रूप या आकारावरून ओळखली जावी याची मुख्य कारणे म्हणजे वाचनालयात उजेड कमी असला व पुस्तकांची दाटी जास्त असली की, त्या त्या पुस्तकाची नावे भराभर वाचता येत नाहीत. त्यापेक्षा रंग, आकारावरून शोधली की ती भराभर सापडतात; परंतु कधी अशी फसगत होते.

'मी न्यूयॉर्क पाहिले, शिकागो पाहिले, लंडन पाहिले, टोकियो पाहिले,' असे अभिमानाने सांगणारे बरेच लोक आपल्याला भेटतात. पण मला जर प्रवास करण्याची संधी मिळाली तर मी ल्हासा, खाटमांडू, सिक्कीम व भूतान येथे जाण्याचे पसंत करीन, कारण या शहरांना स्वत:चे असे व्यक्तिमत्त्व व संस्कृती आहे. अफाट औद्योगिकरण झालेली शहरे कमालीची impersonal व dehumanised झालेली वाटतात. शहराचे खरे व्यक्तिमत्त्व प्रचंडतेत नसते. पण 'माझा मीपणा' टिकवून ठेवण्यात असते. काँक्रीटची सहामजली इमारत व ६० मजली इमारत यात फारसा फरक नसतो. रकमेच्या गुंतवणुकीच्या दृष्टीने फरक निश्चित असेल. पण व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीने त्या दोहोत अजिबात फरक नसतो. (अर्थात ली कार्बुसीयरसारख्या माणसाने त्याच्या ब्लू प्रिंटस् केल्या तर फरक असू शकेल.) चारच खोल्यांचे छोटे टुमदार घर वृक्षाच्या मधून पीपींग टॉम सारखे पहायला लागले की, घरचे व्यक्तिमत्त्व कसे असते ते कळून येते.

हजार डोळे असलेले पोटोला. दलाई लामाचे ल्हासामधील निवासस्थान. आधीच तिबेट म्हणजे जगाचे छप्पर. त्याच्या उंचवटयाच्या भागावर ऑक्टोपसच्या पायांसारखे पसरलेले पोटोला. पोटोलावरून ल्हासा शहर पाहिले की, एखाद्या खेडेगावासारखे ते दिसते.

ल्हासा शहराच्या रस्त्याच्या दोन्ही कडेला Poplar (हिवर)ची झाडे असतात. त्याची चंदेरी, सोनेरी पाने वाऱ्याने हालली की, ल्हासा आपल्याच एका जिवंत व्यक्तिमत्त्वाने उठून दिसते. या शहराला वेशी नाहीत, दारे नाहीत, उपनगरे नाहीत. तसे ते इतर चिनी शहरांसारखेच. सरळसोट शहर. चित्रपटगृह, दुकाने, एक क्रांतिकारी संग्रहालय, स्टेडियम व ते शहराचे शाप 'अपार्टमेंटस्'. या रस्त्यावर कातडी झगे व सारांग घालून हिंडताना बरीच मंडळी दिसतात. या कातडी झग्याचा खिसा म्हणजे अल्लाउद्दीनचे 'Open Sesame'. त्यातून कुत्र्याची पिल्ले, माणसांची पिल्ले, खाऊ वगैरे काहीही निघू शकते.

तिबेटन ही भाषा चीनच्या कान्सू प्रांतात, भूतान, नेपाळ, सिक्कीम व काश्मीरच्या काही भागात वापरली जाते.

लामाइझम् हा एक महायान बुद्धीझमचाच प्रकार आहे. त्याचे अनुसरण मुख्यत्वे तिबेट, भूतान व मंगोलियामध्ये होते. या लामाइझम्‌मध्ये लाल हॅट, पिवळी हॅट असे संप्रदाय झाले आहेत. अर्थात् लामाइझममध्ये दलाइ लामा हा राजाच असतो व पंचेन लामा त्याच्या खालोखाल असतो. लामाइझम आचार्यसंप्रदायी, धर्माधिकारी असतो. म्हणूनच तिबेटला Theocratic State म्हणतात. लामाइझममध्ये एक प्रकारची Erotic Mysticism ही असते.

या पुस्तकात पोटालामधील दलाई लामाचा पलंग हा ड्रॅगन व बुद्धाच्या चित्रानी भरून गेला आहे. एवढ्या ड्रॅगनच्या भयंकर चित्रसंग्रहात त्याला झोप कशी लागत होती, याचे आश्चर्य वाटते. आणखीन एका फोटोमध्ये छोटया तिबेटी मुलानी मोठयासारखे झगे घातलेले आहेत. या फोटोतील मुलं मुलं न दिसता अगदी मूर्तिमंत बाहुल्याच दिसतात. जिथे जिथे व्हॅन सुयीनचा फोटो आहे तिथे ती स्टेनोग्राफरसारखी हातात नोटबुक घेऊन उभी आहे. कोणत्याही प्रकारची माहिती असो, त्याची लगेच नोंद करायची संवय लेखिकेला दिसते. या कारणामुळे वर्णने व माहिती लेखिकेने अगदी काटेकोरपणे दिली आहे.

हॅन सूयीन म्हणजे दुसरी पर्ल बक. चीनच्या प्रेमात पडलेली. तिचे आई वडील युरेशियन होते. तिचे शिक्षण लंडन् युनिव्ह-


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
मॅक्झिम गॉर्की
सुमती देवस्थळे
मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

सिटीमध्ये झाले तिचे आत्मचरित्रात्मक पुस्तक (A Many Splendoured Thing) बऱ्याच लोकानी वाचले आहे. तिने आधुनिक चीनविषयी पुस्तकाचे एक त्रिकूट लिहिले आहे

लेखिका म्हणते की, उत्तर काश्मीरमध्ये जसे भारताने पत्रकारांना किंवा टुरिस्टाना जाऊ दिले नाही, तसाच तिबेटही परदेशीयांना बऱ्याच वर्षांसाठी बंद होता. लेखिकेने १९७५ मध्ये तिबेटमध्ये प्रवेश केला. तेव्हापासून मेक्सिकन वकिलांनी, नेपाळचा राजा वीरेंद्र यांनी पत्रकारांसह, फॅलिक्स ग्रीन व नेव्हिल मेक्सिल यांनी, इराणच्या शहाची बहीण राजकुमारी अश्रफ पहेल्वी वगैरे लोकांनी तिबेटला भेट दिली आणि आता पुष्कळ लोक तिबेट पाहण्यास जात आहेत.

या देशात कमी लोक जाण्याचे मुख्य कारण तिकडे हॉटेल्ससारख्या सुविधा जवळजवळ नाहीतच; पण चीनने जगासाठी तिबेटचे प्रवेशद्वार उघडे केले आहे. वर्षानुवर्षे, शतकानुशतके तिबेट बदलला नव्हता, तो बदलायला लागला १९५९ पासून. तिबेटची थिऑक्रेटिक व फ्युडल अवस्था इथपासून संपली.

लेखिकेला असे वाटत आहे की, तिबेटच्या संस्कृतीची पाळेमुळे सातव्या शतकापासून चीनशी निगडित आहेत. हे जरी सत्य असले तरी त्याने काही चीनच्या १९५९ च्या तिबेटी आक्रमणाला परवाना मिळत नाही. असे जगात किती तरी देश असतील की, ज्यांच्या संस्कृतीची पाळेमुळे इतर देशांशी निगडित असतील आणि म्हणून काय या देशांनी आक्रमण करावे ? लेखिकेचा लिहिण्याचा रोख सारखा चिनी आक्रमणाचे समर्थन करण्याकडे आहे.

आता रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केले त्याचे समर्थन कसेही होऊ शकेल. एकदा का मोठ्या देशाने छोट्या देशावर आक्रमण केले की, त्याचे समर्थन कोणत्याच कारणाने करता येत नाही. चीनच्या आक्रमणामुळे तिबेटमधील आचार्यसंप्रदायी राज्याचा अन्त झाला हे बरे झाले; पण त्यामुळे अस्सल तिबेटी व्यक्तिमत्त्वाचा एक मोठा लचकाच तुटला हेही तेवढेच खरे.

—जे. एन. पोंडा

# मुंबईचे कामगार, आनंदवनात....

अरविंद गजेंद्रगडकर

'यंदा आम्ही पण तुमच्याबरोबर आनंदवनाला येणार' बॉम्बे डाइंग मिलमधले काही कामगार–कलाकार मला म्हणतात.

'चला. पण काही कार्यक्रम देणार असाल तर आणखीन चागलं होईल.' मी म्हणालो.

'ठरलं. आमचा ऑर्केस्ट्रा कार्यक्रम होईल. पण रागदारी वगैरे आम्हाला जमायचं नाही. ती तुम्ही बसवून घ्या.'

'ठरलं, उद्यापासून तयारी करू या.' मी म्हणालो. गेल्या वर्षीच्या मार्चपासून ही तयारी सुरू होती.

यंदाच्या दोन आणि तीन फेब्रुवारीला आनंदवनाच्या मित्राचा मेळावा भरत होता. आमंत्रणं कुणालाच पाठवायची नाहीत असं गेल्या वर्षीच ठरलं होतं. तरीसुद्धा अडीच एक हजार जनता जमली होती. शनिवारी संध्याकाळी पाच वाजता मुक्तांगणाच्या शानदार शामियान्यात प्रचंड गर्दी झाली होती. बरोबर पाच वाजता समारंभाला सुरुवात झाली. डॉ. कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे आणि पु. ल. देशपांडे यानी समया प्रज्वलित केल्या. राम शेवाळकरांनी प्रास्तविक करून सभेची सूत्रं न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हाती दिली. सर्वच वक्त्यानी वेळेचं आणि स्थळाचं भान राखून सुटसुटीत आणि समर्पक भाषणं केली. 'वेदांना जे सांगता येत नाही ते वेदनेला सांगता येतं.'–पु. ल. 'आनंदवन हे माणसाळून टाकणारं ठिकाण आहे.'–चंद्रशेखर धर्माधिकारी. 'बाबा म्हणजे माणसातला मानव आहे.'–गुजराथचे सनत् मेहता. या वक्त्याशिवाय, इंदूरचे पत्रकार राहुल बारपुते, कोपरगावचे तरुण प्राध्यापक अनिल सोनार, दाजी पणशीकर, याशिवाय ऑस्ट्रेलियाचे पाहुणे हॉकिन्स याचीही भाषणे झाली.

उद्घाटनाच्या या सोहळ्यातला सर्वात हृद्य प्रसंग म्हणजे डॉ. बावडेकर आणि पु. ल. देशपांडे याचा आनंदवनातल्या अपंग (?) समजल्या गेलेल्या सुहृदांनी केलेला सत्कार. या अपंगानी आपल्या श्रमातून निर्माण केलेल्या भेटवस्तू इतक्या आकर्षक होत्या की, त्याच्याकडे आश्चर्यचकित होऊन बघतच रहावे 'बाबाना व्याधिमुक्त करता आले यातच माझ्या वैद्यकीय ज्ञानाचे सार्थक झाले' असे उद्गार डॉ. बावडेकरांनी काढले, तर भाई देशपांडे इतके गहिवरले होते की, क्षणभर त्याना बोलताच येईना – त्यांना भेट दिलेल्या गालिच्यावर ते प्रेमाने रांगले. म्हणाले, 'एवढ्या प्रेमाने भेट म्हणून दिलेल्या या गालिच्याला पाय लावायची माझी हिंमत नाही !'

या समारंभाच्या आरंभी आनंदवनातल्या अंधशाळेच्या मुलामुलींनी ग. दि. मां. चे स्वागतगीत म्हटले, 'आनंद साधकांनो, मुक्तागणात या रे.' यानंतर डॉ. रूपा कुलकर्णी यानी बाबांची एक कविता सादर केली.

रात्री नऊ वाजता मंडप तर भरलाच होता, याशिवाय बाहेरसुद्धा शेकडो मंडळी उत्सुकतेने उभी होती. पु. ल. देशपांडे, कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे ही मंडळी रंगमचावर होतीच शिवाय बाबा आमटे पण एका मंचकावर लवंडूनच सारा कार्यक्रम ऐकायला सज्ज होते.

रात्रीच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच कामगाराचा ऑर्केस्ट्रा होता. सर्वजण मोठ्या उत्साहाने ठेवणीतले कपडे घालून तयार होते. वर्षभर केलेल्या तयारीची आज परीक्षा होती. "दिवसभर काबाडकष्ट करणाऱ्या बॉम्बे डाइंग मिलच्या या कामगारांच्या हातातून स्वर कसे उमलतात ते ऐका !" प्रा. शेवाळकरानी घोषणा केली. भूप रागातली तीन तालातली गत आणि त्यानंतर

## आनंदवन

बाबांच्या आनंदवनात,
निसर्गाच्या सान्निध्यात,
मित्रांच्या मेळाव्यात,
अंध आणि अपंग,
अनाथ आणि अश्राप जीवांचा
निष्पाप, उत्स्फूर्त आनंद पाहून,
कृत्रिम, व्यवहारी कवचे,
गेली गळून
आणि पहाता पहाता . . .
एकाच ज्योतीची अनेक रूपं
होऊन गेली एकरूप
आनंदवनातील
साधीसुधी, दुर्लभ माणुसकी
स्नेहपूर्ण, अमोल आपुलकी
बंधुत्वाची निर्मळ नाती,
सहानुभूतीची नजर ओली
आत्मविश्वास व उत्साह यांची
उसळती कारंजी,
ह्यांची खास प्रचिती येऊन
जीव जाई अंतर्बाह्य मोहरून,
आणि पहाता पहाता . . .
एकाच ज्योतीची अनेक रूपं
होऊन गेली एकरूप.
आनंदवनातील
जीवनामृत पाजणारी,
सतत वाहती सरिता,
आनंदफुले फुलवणारी,
महाराष्ट्राची गंगामाता,
जलप्राशनाने जिच्या,
दुर्बळ आणि सबळ
साऱ्यांना आले स्फुरून
दृश्य हे पाहून
डोळ्यांचे पारणे गेले फिटून
आणि पहाता पहाता . . .
एकाच ज्योतीची अनेक रूपं
होऊन गेली एकरूप.

—सौ. लीला जोशी

---

एक कजरी धून, या कामगाराच्या वाद्यवृंदाने सुरेख वाजवली. प्रचंड टाळ्या पडल्या. त्यानंतर मधु भंडारे यानं एक मराठी भावगीत आणि त्यानंतर एक हिंदी सिनेगीत प्रभावीपणे गाऊन टाळ्या घेतल्या. दिनेश पवार याने एक अभंग, मिश्र बसंत रागात सादर केला. हृषिकेश बोडस यानं आपल्या नितळ आणि सुमधुर आवाजात 'रतिहुन सुदर मदनमंजिरी' हे गीत इतक्या सहजतेने आणि सुदरपणे गायले की पु. ल. सकट सर्वांनीच त्याला आणखीन एक गीत गायचा आग्रह केला. 'नभ मेघानी आक्रमिले' हे सौभद्रातले पद गाऊन त्याने सर्वांचीच इच्छा पुरी केली. "याचं गाणं ऐकून मला बापू पलुस्कराची आठवण झाली," वसंतराव देशपांडे म्हणाले. सौ. निर्मला गोगटे गायला बसल्या तेव्हा स्वतः पु. ल. पेटीला बसले आणि वसंतराव तबल्याला. ते अनोखे दृश्य पाहून लोक खूष झाले. मुबईहून खास आलेल्या राघवेन्द्र कुलकर्णी या युवकानं दहाच मिनिटं स्वतंत्र तबलावादन करून वाहवा मिळवली. त्यानतर लोकाग्रहास्तव मी आणि मल्हार डी. कुलकर्णी यांनी बासरीची जुगलबंदी सादर केली. आमचा हंस—ध्वनी सर्वांना आवडलेला दिसला. त्यानंतर मला स्वरमंडल वाजवावेच लागले. साथीला राघवेन्द्र होताच. पाच मिनिटात धमाल करून टाळ्या घेतल्या. पु. लं. नी शाबासकी दिली. बरं वाटलं.

'फिरस्ता कलाकार' वसंत पोतदार यांनी बाबाच्या काही कविता इतक्या प्रभावीपणाने म्हटल्या की, लोक रोमाचित झाले. धुळ्याच्या सौ. शहानी मात्र लोकाचा अंत पाहिला. काही लोकांना कुठे थाबावे हेच कळत नाही. असो. कुमार गंधर्वांची कन्या कलापिनी आणि पत्नी सौ. वसुधरा यानी पण हजेरी लावली. वसंतरावांनी दोन नाटचगीतं सादर केली. पेटीला पु. ल. आणि तबल्याला मल्हार डी. कुलकर्णी होते.

शेवटी स्वतः कुमार गधर्व यांनी भैरवीची होरी गाऊन या भावपूर्ण मैफिलीची सागता केली.

सकाळी सात वाजताच मुक्तागणाचा परिसर माणसानी पुन्हा एकदा गजबजून गेला होता. आठ वाजता बालतरूची पालखी निघणार होती. सर्व मंडळी आंघोळी आटपून आणि ठेवणीतले कपडे घालून या पालखीसाठी हजर होती. रंगीबेरगी फुलापानानी सजवलेली पालखी निघाली. वसंतरावानी 'देवकीनंदन गोपाला'ची धून म्हणायला सुरुवात केली. लोकही गाऊ लागले. पालखीसकट लोकं निघाली, 'गोकुळाच्या' आवारात आली. तिथे व्याधिमुक्तानी कसरतीचे असे काही खेळ दाखविले की, लोक आश्चर्यचकित होऊन पहात राहिले. त्यानंतर बालतरूसाठी पंचमहाभूताना आवाहन करणारे मराठी मंत्र म्हणण्यात आले. या समारंभातला सर्वात उत्कट आणि भावस्पर्शी समारंभ म्हणजे 'धरती' या मुलीचे उष्टावण. काही दिवसापूर्वी वरोरा रेल्वेफाटकाजवळ कुणी तरी एक लहान मूल सोडून गलं होत. अंगावर फाटकं वस्त्र आणि तोडात चोखायला एक ओली चिंधी. या अनाथ पोरीला बाबानी आणि साधनाताईंनी हृदयाशी धरल. तिचं नाव ठेवलं धरती ! व्याधिमुक्त अंजनाबाई धरतीच्या आई झाल्या. त्याच्या हस्ते या धरतीचं उष्टावण झालं तेव्हा सारा प्रेक्षकवर्ग भारावून गेला. याच प्रसगी काही व्यक्तींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं आणि दुपारी एकच्या सुमाराला हा सोहळा संपला. बाबांच्या अचाट कर्तृत्वाने भारावलेली मंडळी एका नव्या स्फूर्तीनं झपाटून परतली. □

रंगभूमी । विनया खडपेकर

# पोस्टर

## गतिमान कथा, आकर्षक प्रयोग

छबिलदासच्या रंगमंचावर सादर झालेल्या 'पोस्टर' या हिंदी नाटकाला एक स्पष्ट, निश्चित असा विषय आहे. शिवाय सुसंबद्ध कथानकही आहे. छबिलदासमध्ये एवढे असणे ही केवढी जमेची बाजू! ज्यांनी 'खजिन्याची विहीर' आधी पाहिले असेल त्यांना या माझ्या विधानाचे महत्त्व पटेल! असो.

नाटकाच्या विषयात तसे नाविन्य नाही. 'मालक आणि मजूर' किंवा पारिभाषिक भाषेत बोलायचे तर 'आहे रे आणि नाही रे' यांच्यामधील संघर्ष हा या नाटकाचा विषय आहे. तोच या नाटकात खेचून घेतला आहे. दोन कीर्तनकार लोकांना कथा सांगतात. पटेल हा एका खेडेगावातला जमीनदार—सगळ्या आदिवासी मजुरांना कमी पैशात राबवून घेणारा. निरक्षर, अडाणी, कोणतेच आधुनिकतेचे वारे माहीत नसलेल्या त्या आदिवासी लोकांना तो देवच आहे. एके दिवशी शहराच्या रस्त्यात सापडलेले पोस्टर चैती गंमत म्हणून कारखान्यात आणून लावते. ते मजुरांसाठी मागण्या करणारे पोस्टर असते. मालक ते पाहून भडकतो. स्वतःहून पंचवीस पैसे वाढवून देतो. मजूर मास्तरकडून पोस्टर समजावून घेतात. पैसे वाढवून मिळण्याची ताकद पोस्टरमध्ये आहे हे कळल्यावर मालकाशी असहकार पुकारतात. कल्लू आपली पत्नी चैती हिला कामासाठी मालकाच्या हवेलीवर पाठवीत नाही. सगळे मिळून मालकाला मारहाण करतात. मात्र पोलीस कल्ल्यालाच घेऊन जातात. कथन करणारे हरिदास लोकांना सांगतात, कल्लूचा झगडा अर्धा सोडू नका. असे हे कथानक

न कंटाळता सतत दीड तास आपण हे नाटक पाहू शकतो. अधूनमधून वाहणारे संगीत, कलाकारांचे एकंदर अभिनय, रंगमंचावरील विविध दृश्ये सादर करण्याचे उचित भान, गतिमान कथा यामुळे नाटक पहाताना दोष कितीही जाणवले तरी आपण गुंतून पडतो हे या नाटकाचे श्रेय. बाकी चालू युगातील एका प्रश्नाचे (आहे रे, नाही रे) ढोबळ मानाने या नाटकात दर्शन होते इतकेच. कोठेही भाषणबाजी नाही हाही एक विशेष.

नाटकातील विषयाचा विचार करता त्यात वास्तवाचे योग्य ते निरीक्षण दिसत नाही. केवळ एक पोस्टर पाहून जमीनदार पंचवीस पैसे वाढवून देतो हे पटत नाही. आपल्या मजुरांनी केवळ गंमत म्हणून पोस्टर लावले आहे की, त्याच्यामागे कोणती बंडखोर संघटना आहे हे जाणण्याइतका जमीनदार किंवा कोणताही सत्ताधारी शहाणा असतो. पोस्टर कसे लागले याचा थांग लागल्याशिवाय पैसे वाढवून देण्याइतका मूर्ख तो खासच नसतो. दुसरे म्हणजे कल्लू मास्तरांकडे जातो आणि ते स्वतःच्या हस्ताक्षरात त्याला पोस्टर तयार करून देतात ही गोष्ट लहानशा खेडेगावात लपून राहणे शक्य नाही. आधी भित्रा असलेला मास्तर एकदम पोस्टर्स तयार कशी करून देतो तेही कळत नाही. आदिवासी मजूर निरक्षर, अगतिक, कोणत्याच आधुनिक विचारांचे वारे न लागलेले असे दाखविले आहेत. मालक म्हणजे त्यांचा देव आहे. मालकाकडे चैतीला पाठवायलाच पाहिजे, असे म्हणणारे आहेत. ते मुंबईतल्या मिलमजुरांसारखे अगदी अचानक संघटित होतात हे शक्य वाटत नाही.

लोकनाटचाच्या शैलीत नाटक सादर होते. औद्योगीकरणामुळे आजच्या युगात निर्माण झालेल्या एका गुंतागुंतीच्या समस्येचे दर्शन घडविण्यासाठी लोकनाटचाच्या शैलीचे माध्यम योग्य वाटत नाही. लोकनाटच कहाणीवजा असते. मानवी स्वभावाचे एखादे वैशिष्टच किंवा प्रश्न त्यात ठळकपणे मांडलेला असतो. ते उस्फूर्त असते. विश्लेषणात्मक नसते. चिकित्सक नसते. याउलट 'पोस्टर' या नाटकातील विषय विश्लेषणाची, सूक्ष्मतेची अपेक्षा करणारा आहे. नाटकाचा विषय आणि फॉर्म यांचा सूर अशा प्रकारे जुळत नाही. म्हणूनही नाटकातील विषय व्यापक, सखोलपणे न मांडला जाता ढोबळपणे मांडला जातो.

नाटकाचा प्रयोग एकंदर ठीक वाटतो. पात्रांची वेषभूषा, एकंदर हालचाली, खेडेगावच्या-वन्य खेडेगावची वातावरणनिर्मिती सहजपणे करतात. कारखान्यातील कामाचे दृश्य, मुकादमाची गडबड, मधेच मालकाचा फेरफटका हे सारे वातावरण अगदी योग्य उभे केले आहे. सुरेखा देसाई (चैती) यांचा चेहरा, वागण्याची-बोलण्याची पद्धत अगदी आधुनिक शहरी मुलीची वाटते. बाकी कलाकार आपल्या भूमिका ठीक करतात.

'आविष्कार' निर्मित या हिंदी नाटकाचे लेखक आहेत डॉ. शंकर शेष. या नाटकाचा पहिला प्रयोग ५ फेब्रुवारीला रात्री साडेआठ वाजता छबिलदासच्या रंगमंचावर सादर झाला. श्रीकान्त दादरकर, चंद्रशेखर कामेरकर, (कथाकार, स्वामी व गुरुजी), प्रभाकर कले (पटेल), दीनदयाळ खंडेलवाल (कारिंदा), परमजीत लुथ्रा (फॉरेस्ट ऑफिसर), अविनाश स्मार्त (कल्लू), निर्दोष कुबडे, अरुण अत्रे, सुनील हुदलीकर, जगदीश छापेकर, शहाजी शिंदे, माधव दळवी, नितिन साधले, राजेंद्र बारोट, आनंद खिल्लारे, वसंत मगीराज, दीपक देशपांडे, नामदेव जाधव, मनोहर पंडित, श्याम शिरगावकर, गुरुदत्त लाड, विजय सातवळेकर (सर्व मजूर) यांनी भाग घेतला होता. या सगळ्यांनीच आपल्या भूमिका समजून केल्यामुळे प्रयोग चांगला झाला. संवाद-पाठांतर कच्चे होते. दोनतीन ठिकाणी संवाद विसरल्यामुळे कलाकार चक्क गप्प झाले. विसरणे निभवूनही नेता आले नाही.

तरीही छबिलदासच्या रंगमंचाबद्दल काही आशा निर्माण करणारे असे हे नाटक वाटले.



# चित्रपट

सदानंद बोरसे

## काली घटा

डबल रोल अर्थात अगदी एकसारखे दिसणारे दोघेजण (बहुतेक वेळा हे दोघेजण वा दोघीजणी लहानपणीच जत्रेमध्ये बिछडलेले जुळे भाऊ वा जुळच्या बहिणी असतात.) अशी मध्यवर्ती कल्पना घेऊन आजपर्यंत कैक चित्रपटांमध्ये कैक कथा बेतल्या आहेत. एकसारख्या दिसणाऱ्या बहिणी आणि त्यांच्याभोवती फिरणारे रहस्य म्हटले की, पार नर्गिसच्या 'अनहोनी'पासून साधनाच्या 'वह कौन थी !', 'मेरा साया'पर्यंत अनेक चित्रपट आठवतात. रेखाची दुहेरी भूमिका असलेला 'काली घटा' हाही याच साखळीतील आणखी एक चित्रपट.

रेखा आणि रश्मी (दोन्ही रेखाच) या सतपालसिंगच्या अनुक्रमे ज्येष्ठ व कनिष्ठ कन्या. प्रेम (शशी कपूर) हा रेखाचा प्रियकर आणि किशोर (डॅनी डेंझोंपा) हा रश्मीचा प्रियकर. सतपालसिंगचा खून झालेला असतो आणि रेखाच्या खुनाचा प्रयत्न होतो. मग 'खुनी कोण ?' या रहस्याचा भेद करण्यासाठी रेखा आपण मेलो असल्याचे नाटक करून रश्मी बनून येते आणि कधी प्रेम खुनी, कधी किशोर खुनी असे बराच वेळ तळचात-मळचात होऊन शेवटी 'इंतकाम लेनेवाला किसीका बाप नहीं होता, किसीका ये नहीं होता, वो नहीं होता; तर तो सिर्फ इंतकाम लेनेवालाच होता है।' अशा अर्थाची बरीच मोठी बडबड उंच चिरकी पट्टी लावून करीत रेखा-रश्मीच्या इस्टेटीचा दिवाण (ए. के. हनगल) आपण खुनी असल्याचे मान्य करतो. या संपूर्ण कथेतही ज्याच्यावर प्रेक्षकांचा संशय येणार नाही, अशा निरपद्रवी व निरुपयोगी व्यक्तीला खलनायक म्हणून पुढे आणायचे ही रहस्यपटातील जुनाट युक्ती वापरली आहेच. शिवाय हनगलच्या इतर चित्रपटांमधील सोज्ज्वल कामांचा फायदा घ्यायचा प्रयत्न केला आहे; पण बोटावर मोजण्याइतके चित्रपट सोडल्यास हनगलची ठाशीव प्रतिमा प्रेक्षकाच्या डोक्यात नसल्याने आणि 'काली घटा'मध्येही शेवटी त्याची खलनायकगिरीही मिळमिळीतच राहिली असल्याने चित्रपटाचा वाईटपणा कमी होण्यासाठी त्याचा फारसा फायदा झालेला नाही.

मग सबंध चित्रपटामध्ये रश्मी बनून आलेली रेखा, प्रेम आणि किशोर असे त्रिकोणी प्रेम, रेखा व प्रेम एकमेकांना हाक मारण्यासाठी वा 'ओ' देण्यासाठी म्हटलेली काही पिळवट गाणी, चित्रपटांच्या घटना सूचक स्वरूपात एखाद्या नाचात सादर करणे, मारामाऱ्या, बेफाम पाठलाग वगैरे अशी इकडून तिकडून केलेली उधारउसनवारी भरपूर आहे कथेचे लेखक वेद राही हेच चित्रपटाचे दिग्दर्शकही आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शक म्हणून तर त्यांची कामगिरी महानच आहे. खरा खुनी कोण, हे कळू द्यायचे नाही यासाठी सतत फक्त त्यांच्या पावलांवर कॅमेरा ठेवायचा. असल्या युक्त्या आता इसवी सनपूर्वकाळात जमा झाल्याचे राहीसाहेबांना बहुधा ठाऊक नसावे. गाण्याच्या प्रसंगी 'काली घटा छायी' या ओळीला फक्त अगदी Silver lining असलेला मोठा थोरला काळा ढग आणि बाकी सर्व गाण्यामध्ये निळेभोर निरभ्र आकाश, पिवळेधमक स्वच्छ ऊन अशा गमतीही त्यांनी भरपूर केल्या आहेत.

थोरली रेखा ही गंभीर, संथ प्रकृतीची, जबाबदार तरुणी तर धाकटी रश्मी ही नटखट, शोख, उच्छृंखल, चंचल वगैरे स्वभावाची (अर्थात त्या अशा असाव्यात, असे आपले चित्रपटातील काही वर्णनांवरून माझे मत झाले ) हा फरक दाखविण्यासाठी रेखाने स्वतः फारशी तसदी घेतली नाही. एका वेळी दोन दोन रेखा पडद्यावर दाखवताना त्या वेगवेगळ्या वाटतील अशी काळजी छायाचित्रकार घेईलच, अशी तिची गैरसमजूत झाली असावी. बाकी शशी कपूर पोलीस, खून असे उल्लेख आले की, घाबराघुबरा चेहरा करून आणि डॅनी सतत गुरगुर करीत प्रेक्षकाला 'अहो. मीच खरा खुनो आहे, असं वाटून घ्या बरं का.' असं सांगण्याचा प्रयत्न करीत असतात. ए. के. हनगलकडे खून, मारामाऱ्या, पाठलाग अशी त्याच्या प्रकृतीला न झेपणारी कामे दिल्याबद्दल मला तर शेवटी त्याच्याबद्दल अपार सहानुभूती वाटली.

'काली घटा'चे संगीतकार आहेत लक्ष्मीकांत प्यारेलाल आणि गीतकार आनंद बक्षी. प्रेक्षकाला रहस्य, भीती वगैरे गोष्टींची ओळख पटावी, म्हणून संबंधित प्रसंगांच्या पार्श्वसंगीतात किंचाळच्या आणि कर्णकर्कश संगीताचा सढळ हाताने उपयोग करून लक्ष्मीकांत प्यारेलालनी प्रेक्षकांचे कान पुरेसे जायबंदी करण्याची काळजी घेतली आहे. आशा भोसले यांचे 'नयनों की खिडकी, दिल का झरोखा' हे गीत वगळता इतर सर्व गीते तद्दन रद्दी व सामान्य आणि म्हणूनच चित्रपटाच्या दर्जाला साजेशी.

थोडक्यात हल्लीच्या बहुतेक हिंदी चित्रपटांच्या 'also ran' माळेत शोभणाराच 'काली घटा' आहे.

## सप्रेम नमस्कार....

पृष्ठ २ वरून

इतका अशास्त्रीय दृष्टिकोणाबद्दल लिहिताना पतप्रधानपद ठाम संभाळणे वा शंभर वर्षे जगणे यासारख्या विधानाना आपल्या उत्तरात जागा देतात यात नवल ते काय ?

शिवाम्बूपानावर जगभर झालेले प्रयोग माहिती करून घ्यावेत वा कोणी करणार असेल तर त्याबद्दल माहिती घ्यावी. अन्यथा अद्याप या विषयावर संशोधन झालेले नाही असे म्हणावे. एवढा उदारमतवादीपणा 'शास्त्रीय लेखात' डॉक्टरनी जरूर दाखवावा. अन्यथा पुण्यासारख्या भारतातील दहाव्या क्रमांकाच्या शहरातीलही विद्युतदाहिनी महिना महिना बंद राहात असता गावोगावी विद्युद्दाहिन्या उघडाव्यात असल्या अव्यवहारी सूचनांची टिंगलच डॉक्टरांच्या पदरात पडेल. अंधश्रद्धावर लिहिणारे डॉक्टरांसारखे जे थोडे, मोजकेच लेखक आहेत त्यांचे चांगले लिखाण मात्र अशा सूचनामुळे विनाकारण टीकेच्या पुरात वाहून जाते. ते व्हायला नको असे आवर्जून वाटते म्हणूनच केवळ या पत्राचा प्रपंच.

८ फेब्रुवारी — श्रीराम गीत, पुणे

▫ आपला २६ जानेवारी, प्रजासत्ताकदिनी प्रसिद्ध झालेला अंक माझ्या दृष्टीने अनेक गोष्टींनी – घटनांनी – वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांतील दोन महत्त्वपूर्ण लेखाचा उल्लेख करावासा वाटतो.

१ : डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी 'महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रातील बिनीचे सरदार' या लेखाने प्रा. गं. बा. सरदार याची जी ओळख करून दिली आहे ती अत्यंत उद्बोधक आहे. महाराष्ट्रात अशा अनेक व्यक्ती आहेत की, ज्यांना प्रसिद्धीचे वावडे आहे अशा प्रसिद्धिपराङ्मुख व्यक्तीची कार्ये जनतेपुढे आणलीच पाहिजेत. कै. आचार्य अत्रे म्हणत असत महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे. प्रा. गं. बा. सरदार यांनी वामन मल्हारांचा वारसा कसा चालविला आहे याचे उत्कृष्ट दर्शन आपल्या लेखाने श्री. कुलकर्णी यांनी सिद्ध केले आहे. अनेक वर्षे कित्येक साहित्यिकांनी लिहिलेले साहित्य मी शिकविले; परंतु अशा विचारवंत सरदारांचा व माझा साहित्यिक परिचय नव्हता त्यामुळे मी एक प्रकारच्या आनंदाला मुकलो होतो.

२ : दुसरा महत्त्वाचा लेख म्हणजे प्रा. अशोक चौसाळकर याचा 'पुनरागमन असे घडले', हा होय. हा लेख वाचून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे अलौकिक कर्तृत्व नजरेसमोर येते. राजकारणाच्या धूर्ततेमध्ये श्रीमती गांधींचा पराभव करणारी व्यक्ती अजून जन्मास यावयाची आहे, हे निश्चित. प्रा. अशोक चौसाळकर यानी किती अभ्यासपूर्ण लेख लिहून बाईंचे यथार्थ दर्शन घडविले आहे ! त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

मला येथे सहजगत्या एक गोष्ट आठवते. संत मीराबाई एकदा एका महंताच्या दर्शनास गेल्या होत्या. तेव्हा महंतातर्फे त्यांना सांगण्यात आले की, महंतजी स्त्रियांना दर्शन देत नाहीत ! तेव्हा संत मीराबाईंनी त्या महंतास कळविले की,'बाबा रे या जगात फक्त भगवान एक पुरुष आहेत बाकी सर्व स्त्रियाच आहेत.

मला वाटते प्रा. अशोक चौसाळकर यांच्या लेखावरून आपल्या भारतात एक इंदिरा गांधीच 'पुरुष' आहेत बाकी सर्व —

श्री. चरणसिंग जरी किसानांचे पुढारी असले तरी खरा किसान श्रीमती इंदिराजीच असे वाटते. कसे ते पहा : एक शेतकरी आपल्या शेतात खेकडे पकडत होता. त्याने एक खेकडा पकडला व टोपलीवर झाकण ठेवले. आणखी पाचसहा पकडल्यावर झाकण काढून टाकले. तेव्हा त्याला एका सुशिक्षित पंडितजीने विचारले, 'आता झाकण का काढलेस ?' त्याने उत्तर दिले, 'साहेब, आता या टोपल्यातून एकही खेकडा बाहेर जाणार नाही. एक दुसऱ्याचे पाय ओढील.' जनता पुढाऱ्यांचे असेच झाले याची खात्री प्रा. चौसाळकर यांच्या लेखावरून पूर्ण झाली.

याच अंकातील अटलबिहारी याचाही पराभवाविषयी लेख चिंतनीय वाटला व आताच आलेल्या ता. २ फेब्रुवारीच्या अंकातील 'आज आमचं अफगाणिस्थान संपलं' यातील रशियाची भयसूचक पावलाची ओळख व जाणीव श्रीमती प्रतिभा रानडे यांनी जी करून दिली आहे ती एक विचार करणारास विचार करावयास लावणारी बाब आहे निश्चित.

३१ जानेवारी — के. जी. कुलकर्णी, मुंबई

□ 'माणूस'च्या २६–१–८० च्या अंकात 'पुनरागमन असे घडले. पुनर्मांडणी मात्र कठीण' हा प्रा. अशोक चौसाळकर याचा नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रस्थापित डाव्या शैलीत लिहिलेला विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखातील अन्य वादस्थळाकडे लक्ष न वेधता फक्त एकाच महत्त्वाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधीत आहे. प्रा. चौसाळकर एका ठिकाणी म्हणतात की, इंदिरा गाधींना 'आणीबाणीच्या काळात देखील संसदीय लोकशाही नष्ट करावयाची होती असे वाटत नाही...१९७७ साली निःपक्ष (म्हणजे काय ?) आणि स्वतंत्र निवडणुका घेऊन त्यांनी पुनः संसदीय लोकशाहीची पुनःस्थापना केली. शांततामय मार्गाने सत्तांतर करून त्यांनी त्यांच्या राजकीय जीवनातील सर्वात चांगली गोष्ट केली.'

लेखकाचे वरील मत पटण्यासारखे नाही. कारण आणीबाणीमधील वर्तमानपत्रांना लागू केलेली पूर्व तपासणी, घाईघाईने केलेल्या घटना दुरुस्त्या, वर्तमानपत्रांसंबंधीचे अन्य कायदे, गोरगरीब लोकावर करण्यात आलेला जुलूम वगैरे अनंत अन्याय्य गोष्टींमुळे संसद अस्तित्वात राखूनही संसदीय लोकशाही इंदिरा गांधींनी संपविलेलीच होती. १९७७ साली त्यांनी निवडणुका घेतल्या, (आणि त्या स्वतंत्र घेतल्या हे त्याचे श्रेय त्याना जरूर मिळते.) त्या काही लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी घेण्यात आल्या नव्हत्या. आपण या निवडणुका जिंकू अशी खात्री वाटल्याने आणि आपल्या आणीबाणी–संस्कृतीच्या राजवटीला लोकांची मान्यता मिळावी म्हणून त्यांनी त्या निवडणुका घेतल्या होत्या. एका बेसावध क्षणी त्यांनी निवडणुका घेण्याची डावपेचात्मक चूक केली व ती भारतातील लोकांच्या चांगलीच पथ्यावर पडली आणि म्हणूनच येथे शांततामय सत्तांतर होऊन दुसऱ्या भारतीय प्रजासत्ताकाचा जन्म झाला. (पहिले भारतीय प्रजासत्ताक २६ जून १९७५ या दिवशी मृत झाले होते.)

३० जानेवारी ८० — म. मो. पेंडसे, मुंबई

**रा. स्व. संघापासून स्फूर्ती घेऊन काही मंडळींनी मध्य प्रदेशात चांपा येथे कुष्ठनिवारणाचे कार्य गेली काही वर्षे नेटाने व विलक्षण जिद्दीने चालविलेले आहे. हे कार्य यंदाच्या अभूतपूर्व दुष्काळामुळे आज संकटात सापडलेले आहे. या संकटावर मात करण्यासाठी....**

# आवाहन

*अवेळी आणि नावापुरतं पडलेलं पावसाचं पाणी दुष्काळाची पेरणी* करून गेलं आणि केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या मध्य प्रदेशातील छत्तीसगढ ह्या भागात दुष्काळानं हाहा:कार उडवून दिला. नक्षत्रासारखी नक्षत्रं कोरडी ठणठणीत गेली. पावसाच्या काळजीनं धरणीच्या काळजाला तडे गेले. ज्यानी ह्या भागातील पूर्वीचे दुष्काळ पाहिले आणि अनुभवले होते असे वयस्कर निक्षून सागू लागले की, गेल्या कित्येक वर्षांत असा दुष्काळ त्यांनी कधी पाहिला वा अनुभवला नव्हता ! सागणारे खरं तेच सागून गेले की, पुरानं दुथडी भरून वाहणाऱ्या नदीच्या पाण्यापेक्षा कोरडया ठणठणीत नदीचं पाणी माणसाला जास्त तडफडून ठार मारतं आणि म्हणूनच की काय, इथल्या अविकसित खेडयातील गरीब शेतकऱ्याचे आणि गावकऱ्याचे ताडेच्या तांडे पोटासाठी दशदिशा मोकाट सुटले आणि खेडीपाडी ओस पडू लागली. वीतभर पोटाच्या टीचभर खळगीला लागणाऱ्या मूठभर अन्नाच्या उद्याच्या घासासाठी स्वतःच्या पाठीवर वा पुडलिकाप्रमाणं कावडीत प्रपंचाची गाठोडी बांधून दूरवर अदृश्य होत जाणाऱ्या त्या अभागी शेतकऱ्यांच्या 'कारव्यांकडे' पाहिले की वाटायचं, अशा दुःखातसुद्धा ते अभागी जीव सुखी आहेत; स्थलांतर करून का होईना, पुढच्या पावसाळयापर्यंत ते आपली कशीबशी गुजराण तरी करू शकतील; पण... मुक्या गुराढोरासह आणि अपंग आणि उपेक्षित बेसहारा कुष्ठ–रुग्णासह आम्ही आमचा 'कारवाँ' घेऊन जाणार तरी कुठं? कारण दु.खी कुष्ठ–रुग्णाचा उदरनिर्वाह आमच्या आश्रमावर अवलंबून, आश्रम शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून, शेतीचं उत्पन्न पावसाच्या पाण्यावर अवलंबून आणि पावसानं तर दगा दिला ! आमचा 'कारवाँ' स्थलांतर करणार तरी कसं ? पण...

पण...हताश कुष्ठ-रुग्णाना दैवी निर्धारानं साथ दिली आणि निधडया छातीनं अपंग कुष्ठ-रुग्णानी शेतात नांगर धरले. रात्रीचे दिवस झाले आणि भगीरथ प्रयत्नांच्या गंगोत्रीनं भू मातेला गहिवर आला आणि काय सांगावं, इथल्या परिसरात आमच्या आश्रमाच्या उभ्या शेतीकडे पाहून अपंग कुष्ठ-रुग्णांच्या श्रमाला जाणाऱ्या-येणाऱ्याची दृष्ट लागण्याची पाळी आली. नेहमी जेवढी तांदळाची पोती हाती लागत त्याच्या निम्म्याहून जरी कमी पोती हाती लागली तरी ती तुटपुजी 'दौलत' पोत्यात बांधताना आणि बैलगाडीवर चढवताना आश्रमवासी कुष्ठ-रुग्णाचा आनंद गगनात मावेनासा झाला. पहिल्या पावसाच्या सरीनं पुलकित झालेल्या मातीचा सुगंध जसा साऱ्या वातावरणात भिनून जातो ना, अगदी तसाच आमच्या आश्रमाचा सारा परिसर त्यांच्या अभूतपूर्व आनंद-वर्षावाच्या सुगंधानं दरवळू गेला ! तरी पण...

तरी पण अपंग कुष्ठ-रुग्णांच्या अर्ध्याहून अधिक तादळाच्या पोत्यांबरोबरच, दुष्काळानं त्यांचं इतर धान्यही त्यांच्यापासून हिरावून नेलं! आणि दुष्काळात 'तेरावा' म्हणूनच की काय तेल-मिरची-मसाल्यापासून ते कपडालत्त्यापर्यंत सर्वच वस्तूंच्या किंमतीनी उच्चांक गाठले ! पैसे वारेमाप फेकूनसुद्धा औषधे दुर्मिळ झाली ! अकस्मात व अकल्पित प्रसंगामध्ये वज्राघाताने एखादा प्रापंचिक ज्याप्रमाणे पगाराच्या दिवशी भांबावून जातो त्याप्रमाणे ह्या अभूतपूर्व दुष्काळाच्या वज्राघातानं आम्ही सर्व कार्यकर्ते भांबावून गेलो आहोत. कुष्ठ-रुग्णाना लागणाऱ्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंची भयानक त्रुटी पुढच्या पावसाळयापर्यंत भरून कशी निघणार ही आमची विवंचना आहे. म्हणूनच सर्व प्रकारच्या त्रुटीच्या पूर्ततेसाठी आश्रमवासी कुष्ठ-रुग्णांच्या वतीनं हे 'आवाहन' करीत आहोत. विश्वास आहे की आतापर्यंत मिळत गेलेला सर्वांचा निरपेक्ष सहयोग या वेळी लाभेल.

**[ गेल्या अंकातील वर दिलेले 'आवाहन' वाचून काही मंडळींनी 'माणूस' कडे या कार्यासंबंधी अधिक चौकशी करून साहाय्य करण्याची इच्छा प्रदर्शित केली. आणखीही अनेकांना या कार्याचे आकर्षण वाटण्याची शक्यता आहे. त्यांनी संस्थेशी समक्ष पत्रव्यवहार करून संपर्क साधणे चागले. म्हणून या अंकी संस्था सचिवांचा नाव-पत्ता देऊन 'आवाहन' पुन्हा प्रसिद्ध केले आहे. – संपादक ]**

दा. ग. बापट, सचिव
भारतीय कुष्ठ-निवारक संघ
मुक्काम-पोस्ट : चापा ४९५६७१
जिल्हा : बिलासपूर (मध्य प्रदेश)